नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ / ९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com




* वर्ष ५१ * अंक २०९ * * अमरावती * रविवार, दिनांक १ फेब्रुवारी २०२६ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## थोडक्यात...

### एसआयआरमधून घुसखोर बाहेर काढले जातील



■ **कोलकाता :** गृहमंत्री अमित शहा यांनी पश्चिम बंगालच्या नॉर्थ परगना येथे सांगितले की, ममता सरकार घुसखोरांना संरक्षण देत आहे. बंगालचे लोक तृणमुलला उपटून टाकतील. त्यांच्या निरोपाची वेळ आली आहे. ममताजींना एसआयआरचा जेवढा विरोध करायचा आहे तेवढा करू द्या. मतदार यादीतून घुसखोरांना काढावेच लागेल. जे घुसखोर उरले असतील, त्यांना भाजपचा मुख्यमंत्री येऊन बाहेर काढेल. वर्ष २०२६ हे तृणमुलला 'टाटा, बाय-बाय' म्हणण्याचे वर्ष आहे.

### रॉन्ग साइड ट्रकचा कहर ५ जणांचा मृत्यू

■ **गंजम :** ओडिशातील गंजम जिल्ह्यातील बेरहमपूर शहरात शनिवारी एका भयानक रस्ते अपघाताने संपूर्ण परिसर हादरून गेला.

हल्दियापदर चौकाजवळ राष्ट्रीय महामार्गावर हा अपघात झाला, जिथे रस्त्याच्या चुकीच्या बाजूने येणाऱ्या एका भरधाव ट्रकने तीन मोटारसायकलींना धडक दिली. या भीषण अपघातात पाच जणांचा जागीच मृत्यू झाला. प्राथमिक माहितीनुसार, ट्रक राष्ट्रीय महामार्गाच्या चुकीच्या बाजूने जात होता आणि एकामागून एक तीन मोटारसायकलींना धडकला. ट्रकने अनेकांना चिरडले. पाच जणांचा जागीच मृत्यू झाला.

अपघातामुळे घटनास्थळी गोंधळ उडाला. मृतदेह रस्त्यावर विखुरलेले होते आणि महामार्गावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती.

# सुनेत्रा पवार नव्या उपमुख्यमंत्री

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३१ :** अजित पवारांच्या निधनानंतर चौथ्या दिवशी त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी आज उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. यासोबतच त्या महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री ठरल्या आहेत.

विधानभवनातील सेंट्रल हॉलमध्ये राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी सुनेत्रा पवार यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मुख्य सचिव आणि राजशिष्टाचार अधिकारी यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटातील आमदार आणि नेते उपस्थित होते.

अवघ्या दहा मिनिटांत साध्या पद्धतीने सुनेत्रा पवारांचा शपथविधी सोहळा पार पडला. सुनेत्रा पवार शपथ घेण्यासाठी जात असताना, उपस्थितांकडून अजित दादा अमर रहे, एकच वादा अजितदादा, वहिणीसाहेब आप आगे बढो, हम तुम्हारे साथ है.. अशा घोषणा सभागृहात देण्यात आल्या.

आज दुपारी विधीमंडळात राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) आमदारांची महत्त्वाची बैठक पार पडली. यावेळी आमदारांच्या भावना आणि पक्षाची गरज ओळखून सुनेत्रा पवार यांच्या नावाचा प्रस्ताव मांडण्यात आला.

दिलीप वळसे पाटील यांच्या प्रस्तावाला छगन भुजबळ यांनी अनुमोदन दिले आणि सुनेत्रा वहिनींच्या नावाची विधीमंडळ गटनेतेपदी एकमताने निवड झाली. यानंतर तांत्रिक अडचण दूर करण्यासाठी सुनेत्रा पवार यांनी आपल्या राज्यसभा खासदारकीचा राजीनामा उपराष्ट्रपतींकडे सुपूर्द केला.

त्यानंतर राष्ट्रवादीच्या नेत्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन सुनेत्रा पवार यांच्या निवडीचे अधिकृत पत्र दिले. त्यानंतर राज्यपालांच्या संमतीने आज सायंकाळी

## राज्यपालांनी दिली पद आणि गोपनियतेची शपथ
## महाराष्ट्राच्या पहिल्या महिला डीसीएम



विधानभवनात हा ऐतिहासिक शपथविधी सोहळा संध्याकाळी ५ वाजता पार पडला.

दरम्यान, या सोहळ्याला राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे बहुतेक सर्व आमदार तसेच या गटाचे ज्येष्ठ नेते उपस्थित होते.

### देशातील तिसऱ्या महिला उपमुख्यमंत्री

मध्य प्रदेशातील काँग्रेसच्या जमुनादेवी १९९८-२००३ दरम्यान उपमुख्यमंत्री बनल्या होत्या. त्यानंतर राजस्थानमध्ये कमला बेनीवाल यांनी हे पद २००३ मध्ये भूषवले होते. २००४ ते २००७ अशी तब्बल ४ वर्षे पंजाबमध्ये राजिंदर कौर भट्टल यांनी उपमुख्यमंत्रिपदावर कार्य केले आहे.

१९९९ मध्ये आंध्र प्रदेशात वायएसआर काँग्रेसच्या पुमला पुष्पा श्रीवानी तर बिहारमध्ये भाजपच्या रेणूदेवी यांनीही २०२० ते २०२२ मध्ये उपमुख्यमंत्री म्हणून काम केले आहे. आता १५ डिसेंबर २०२२ पासून राजस्थानात दिया कुमारी भजनलाल सरकारमध्ये कार्यरत आहेत.

प्रवती परिदा १२ जून २०२४ पासून ओडिसा राज्याच्या उपमुख्यमंत्री आहेत. सर्वात तरुण म्हणून पमुला पुष्पा यांनी काम केले आहे. शपथ घेतली त्या वेळी त्या ३३ वर्षांच्या होत्या. तर कमला बेनीवाल यांनी ७६ व्या वर्षी हे पद भूषवले आहे. महाराष्ट्रात सुनेत्रा पवार या देशातील तिसऱ्या उपमुख्यमंत्री असतील.

अजितदादांच्या निधनाच्या चौथ्या दिवशी त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर आज त्यांना खात्यांचे वाटप करण्यात आले. सुनेत्रा पवार यांच्याकडे राज्य उत्पादन शुल्कासह तीन महत्त्वाची खाती देण्यात आली आहेत. मात्र, अजित पवारांकडील सर्वात प्रभावी मानले जाणारे 'अर्थ आणि नियोजन' खाते सुनेत्रा पवारांकडे न देता, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ते स्वतःकडेच ठेवले आहे. शपथविधीच्या काही वेळानंतरच सुनेत्रा पवारांना राज्य उत्पादन शुल्क हे राज्याच्या तिजोरीत मोठा महसूल मिळवून देणारे खाते मानले जाते. तरुणांशी संबंधित असलेल्या 'क्रीडा आणि युवक कल्याण' खात्याच्या माध्यमातून सुनेत्रा पवार राज्यभरात आपले जाळे विस्तारू शकतात.

### सुनेत्रा पवार यांचा
राजकीय प्रवास



जन्म
18 ऑक्टोबर 1963

कुटुंब
त्यांचे वडील बाजीराव पाटील आणि भाऊ पद्मसिंह पाटील हे दोघेही राजकारणात होते.

- **शिक्षण :** 1983 मध्ये वाणिज्य शाखेतून पदवी प्राप्त केली.
- **लग्न :** 1985 मध्ये अजित पवार यांच्यासोबत लग्न. 2 मुले, पार्थ आणि जय.
- **सामाजिक कार्य:** NGO एन्व्हायर्नमेंटल फोरम इंडियाची स्थापना केली. त्यांनी बारामती हाय-टेक टेक्सटाईल पार्कच्या अध्यक्षा म्हणून काम केले, जे हजारो महिलांना रोजगार देते. त्यांनी विद्या प्रतिष्ठानच्या विश्वस्त आणि पुणे विद्यापीठाच्या सिनेट सदस्या म्हणून काम केले.
- **राजकारणात प्रवेश:** 2024 ची लोकसभा निवडणूक बारामती येथून लढवली. शरद पवार यांच्या कन्या सुप्रिया सुळे यांच्याकडून पराभव. 18 जून 2024 रोजी राज्यसभेवर बिनविरोध निवडून आल्या. आता उपमुख्यमंत्री म्हणून काम पाहतील.

### राज्यसभेच्या खासदारकीचा सुनेत्रा पवारांचा राजीनामा

उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेण्यापूर्वी सुनेत्रा पवार यांनी आपल्या राज्यसभेच्या खासदारीचा राजीनामा दिला.

आज दुपारी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या आमदारांची महत्त्वाची बैठक पार पडली. दिलीप वळसे पाटील यांनी सुनेत्रा पवार यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला, ज्याला छगन भुजबळ यांनी अनुमोदन दिले. पक्षाच्या सर्व आमदारांनी या प्रस्तावाचे एकमताने समर्थन केले. या निवडीनंतर सुनेत्रा पवार आता राष्ट्रवादी काँग्रेसच्या विधीमंडळ गटनेत्या म्हणून अधिकृतपणे काम पाहतील.

### राजकीय महत्त्व आणि आव्हाने

सुनेत्रा पवार यांच्या रूपाने महाराष्ट्राला पहिल्या महिला उपमुख्यमंत्री मिळाल्या आहेत. यापूर्वी अनेक महिलांनी राज्याच्या राजकारणात महत्त्वाची पदे भूषवली आहेत, मात्र उपमुख्यमंत्रीपदापर्यंत पोहोचणाऱ्या त्या पहिल्या महिला ठरल्या आहेत. अजित पवारांची प्रशासनावर असलेली पकड आणि त्यांची कामाची शिस्त सुनेत्रा पवार कशा प्रकारे पुढे नेतात, तसेच आगामी निवडणुकांमध्ये पक्षाला कशा प्रकारे नेतृत्व देतात? याकडे लक्ष लागले आहे.

## राष्ट्रवादीचे विलीनीकरण होणार होते...



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ३१ :** महाराष्ट्रात राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या विलीनीकरणावर शरद पवारांनी म्हटले, ही अजित पवारांचीही इच्छा होती. ती नक्कीच पूर्ण व्हायला हवी. शरद पवार म्हणाले की अजित, शशिकांत शिंदे आणि जयंत पाटील यांनी दोन्ही गटांच्या विलीनीकरणाबाबत चर्चा सुरू केली होती.

त्यांनी सांगितले की विलीनीकरणाची तारीखही निश्चित झाली होती. १२ फेब्रुवारीला विलीनीकरणाची घोषणा होणार होती, पण दुर्दैवाने, अजित त्याआधीच आम्हाला सोडून गेले. शरद पवारांच्या विधानावर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित गट) नेते प्रमोद हिंदुराव म्हणाले, ते आमचे ज्येष्ठ नेते आहेत. मी त्यांच्याबद्दल जास्त काही बोलू शकत नाही, पण मला वाटते की येत्या काळात सर्व पक्ष एकत्र काम करतील.

खरं तर अजित यांनी १७ जानेवारी रोजी बारामतीमध्ये शरद पवारांची भेट घेतली होती. भेटीदरम्यान दोन्ही पक्षांच्या ज्येष्ठ नेत्यांनी बारामती कृषी प्रदर्शन, जिल्हा परिषदेच्या निवडणुकांबद्दल चर्चा केली. एकत्र येण्यावर कोणतीही चर्चा झाली नाही.

शरद पवार म्हणाले, या सर्व चर्चा इथे होत नाहीत, त्या मुंबईत होत आहेत. प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे आणि इतर ज्येष्ठ नेते या चर्चा करत आहेत. जे काही दिसत आहे, त्यावरून असे वाटते की हे निर्णय त्यांच्याकडूनच घेतले गेले आहेत.

उपमुख्यमंत्री पदासाठी सुनेत्रा पवार यांचे नाव दिल्याची मला कोणतीही माहिती नाही. त्यांच्या पक्षाने निर्णय घेतला असेल. मी आज वर्तमानपत्रात पाहिले.

प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांसारखी काही नावे आहेत ज्यांनी काही निर्णय घेण्याचा पुढाकार घेतला आहे. जर कुटुंबात काही समस्या असेल, तर कुटुंब एकजूट राहते. कुटुंबात कोणतीही समस्या नाही. शरदपवार यांच्या वक्तव्यावरून अनेक अर्थ काढले जात आहेत.

## मला काहीही माहिती नाही...
### शपथविधीवर सुप्रिया सुळेंची प्रतिक्रिया



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ३१ :** आज सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. या घडामोडींवर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी एका वाक्यात प्रतिक्रिया दिली.

दोन्ही राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाबाबत आणि सुनेत्रा पवारांच्या उपमुख्यमंत्री पदाच्या शपथविधीबाबत बोलताना सुप्रिया सुळेंनी अगदी मोजक्या शब्दांत प्रतिक्रिया दिली. मला यातलं काहीही माहिती नाही, असं म्हणत सुप्रिया सुळेंनी अधिक बोलणं टाळलं.

उद्या संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन आहे. त्यामुळे मला दिल्लीला जावं लागत आहे. आता माझी फ्लाईट असून मी दिल्लीला चालले आहे. कारण मी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाची सभागृह नेता असल्यामुळे मला दिल्लीला जावं लागत आहे, त्यांचा शपथविधी तसेच राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटाचे विलीनीकरण याविषयी मला यातलं काहीही माहिती नसल्याचे त्या म्हणाल्या.

## माणसापेक्षा खुर्ची महत्त्वाची



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३१ :** राजकारणात गेल्या दोन दिवसांमध्ये ज्या घडामोडी पाहिल्या यामुळे असे वाटते की माणसापेक्षा खुर्चीला जास्त महत्त्व आहे. राजकारणामध्ये खुर्ची जिंकलेली आहे, सार्वजनिक जीवनातही खुर्चीच जिंकली आणि माणूस हरल्याचे चित्र दिसून येत आहे. सर्व सामान्य माणसांना या गोष्टी भावत नाहीत, शासकीय दुखवटा संपण्यापूर्वी हे सर्व निर्णय व्हायला नको होत असे मला वाटते, असे शिवसेनेचे मंत्री संजय शिरसाट यांनी म्हटले आहे.

राजकारणातील घडामोडीमध्ये शरद पवारांना विचारले गेले नसावे. पक्षातील नेत्यांनी आणि राजकीय सल्लागारांनी घेतलेला हा निर्णय शरद पवारांना याबद्दल कितपत माहिती आहे हे सांगणे शक्य नाही, असेही संजय शिरसाट म्हणाले.

## मढ्याच्या टाळूवरचं लोणी खाण्याचा प्रकार



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३१ :** सुनेत्रा पवारांच्या शपथविधीबद्दल कुणालाच काही माहिती नाही, हा त्यांचा पक्षाचा अंतर्गत विषय आहे. त्याबद्दल शरद पवार बोलले ते अगदी योग्य आहे. शिंदे आणि अजित पवार यांचा गट हा भाजपच्या गभार्तून आलेली पिल्ल आहेत, ते अमित शहा यांचे पक्ष आहेत, त्यामुळे त्यांचा काय निर्णय घ्यायचा तो अमित शहा आणि भाजपच्या भूमिकेवर ठरेल, असे उबाठाचे खासदार संजय राऊत यांनी म्हटले आहे.

संजय राऊत म्हणाले की, राज्याला महिला उपमुख्यमंत्री मिळणार अशा बातम्या मी ऐकत आहे. सुनेत्रा पवारांना हे पद मिळणार असल्याच्या बातम्या आम्हीही ऐकतो आहोत, हा त्यांचा पक्षाचा निर्णय आहे त्यावर आम्ही काय बोलणार. पण अजूनही महाराष्ट्र अजित पवार यांच्या जाण्याने दुःखातून सावरलेला नाही एवढंच मी सांगू शकतो.

अजित पवार यांच्या कुटुंबातील कोणी भाजपच्या माध्यमातून उपमुख्यमंत्री होणार असेल तर तो त्यांच्या पक्षाचा आणि कौटुंबिक निर्णय आहे. यावर कुणी इतराने मत व्यक्त करण्याची ही वेळ नाही, असेही संजय राऊत यावेळी म्हणाले.

## ९ हजार कोटींची मालमत्ता असलेल्या उद्योजकाची आत्महत्या

■ **वृत्तसंस्था, बेंगळुरू, दि. ३१ :** कॉन्फिडेंट ग्रुपचे अध्यक्ष सीजे रॉय यांनी शुक्रवारी सेंट्रल बेंगळुरूमध्ये रिचमंड सर्कलजवळ असलेल्या कंपनीच्या कार्यालयात स्वतःला गोळी मारून आत्महत्या केली.

पोलिसांच्या माहितीनुसार, ही घटना दुपारी सुमारे ३.१५ वाजता घडली. त्यांनी सांगितले की, गेल्या तीन दिवसांपासून आयकर विभागाची तपासणी सुरू होती. आत्महत्येनंतर आयकर अधिकारी घटनास्थळावरून निघून गेले.

रॉय यांची एकूण संपत्ती ९ हजार कोटी रुपये होती. त्यांच्याकडे खाजगी जेट आणि २०० हून अधिक आलिशान गाड्या होत्या, त्यापैकी १२ रॉल्स रॉयस होत्या. मूळचे केरळचे असलेले रॉय यांचा व्यवसाय कर्नाटक आणि दुबईमध्ये पसरलेला होता. कॉन्फिडेंट ग्रुप केरळ आणि कर्नाटकचा रिअल इस्टेट डेव्हलपर आहे. पोलीस तपास करत आहेत.

### प्रायव्हेट जेट आणि २०० हून अधिक गाड्यांचे मालक





### गल्लीपासून दिल्लीपर्यंतच्या सर्व कार्यकर्त्यांच्या भावना लक्षात घेता

# सुनेत्रा पवारांकडे जबाबदारी सोपवली

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३१ :



सुनेत्रा पवारांच्या शपथविधीबाबत दुसऱ्या पक्षांनी काय बोलावे, हे त्यांचे पूर्ण स्वातंत्र्य आहे. मात्र, काही दुःखद घटना घडल्याने पक्षाचे कार्यकर्ते सैरावैरा झाले आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत अजित पवारांनी दिलेल्या उमेदवारीसाठी बारामतीत प्रचार करत असताना कार्यकर्ते दिशाहीन झाले, त्यामुळे त्यांचे व्यवस्थापन करणे गरजेचे होते. गल्लीपासून दिल्लीपर्यंतच्या सर्व कार्यकर्त्यांच्या भावना लक्षात घेता, नेत्यांनी सुनेत्रा पवारांना हा जबाबदारी हाताळण्यासाठी तयार केले आणि त्यानंतरच त्यांना निर्णयाची माहिती दिली, असे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अनिल पाटील यांनी म्हटले आहे.

अनिल पाटील म्हणाले की, शासकीय दुखवटा पूर्ण झाल्यामुळे नेता निवडणे ही वेळेची गरज होती. राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांच्या भावना लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे. कुणाला कोणते खाते द्यायचे, हा निर्णय मुख्यमंत्री घेतात, आणि तो निर्णय युतीतील सर्व पक्षांनी मान्य करावा लागतो; अर्थ खात्यासंदर्भात अजून काही चर्चा झालेली नाही. नेता निवडीची प्रक्रिया राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांच्या माध्यमातून आज दुपारी पार पडेल, त्यानंतर मुख्यमंत्र्यांना माहिती दिली जाईल.

अनिल पाटील म्हणाले की, शरद पवारांनी केलेले वक्तव्य खरेही असू शकते, परंतु त्यांना सुनेत्रा पवारांच्या शपथविधीबाबत माहिती आहे की नाही, हे स्पष्ट नाही. नेता निवडीची प्रक्रिया फक्त राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांद्वारेच पार पडते, त्यामुळे दुसऱ्या पक्षांचे आमदार यामध्ये सहभागी होणे काही प्रक्रियेचा भाग नाही.

अनिल पाटील म्हणाले की, अजित पवार आणि शरद पवार गटातील नेत्यांमध्ये चर्चा झाली असली तरी ठोस निर्णय अजून झाला नाही. जर अजित पवार याबाबत विचार करत होते, तरी ते पक्षाच्या मंचावर मांडलेले नाहीत. मात्र, त्यांच्या कृती व बॉडी लँग्वेजमधून तसे संकेत मिळाले होते, तसेच स्थानिक निवडणुकीदरम्यान त्यांनी तशा सूचनाही दिल्या होत्या. म्हणूनच, हा निर्णय मजबुरीने घ्यावा लागला आणि कार्यकर्त्यांच्या सैरभैर होण्यापासून थांबवण्यासाठी आणि परिस्थिती हाताळण्यासाठी नेत्यांनी पाऊले उचलली आहेत. अजित पवार यांच्या निधनाचे दुःख आम्ही पचवू शकत नाही. त्यांचा अस्थी कलश आम्ही महाराष्ट्रभर नेणार आहोत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, परिवार, आमदार या जनभावना लक्षात घेऊन सामुदायिकरित्या निर्णय घेतला आहे.असे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी म्हटले आहे.

# देशातील पहिली वकील प्रशिक्षण अकादमी

### तळोजा येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन

■ महासागर प्रतिनिधी, पनवेल, दि. ३१ :



मुख्यमंत्र्यांकडून अजित पवारांच्या कार्यपद्धतीच्या आठवणींना उजाळा देत देशातील पहिल्या वकिल प्रशिक्षण व संशोधन अकादमीचे उद्घाटन पनवेल तालुक्यातील तळोजा औद्योगिक क्षेत्रात पार पडले. सार्वजनिक प्रकल्पांमध्ये गुणवत्ता, शिस्त आणि वेळेचे काटेकोर नियोजन जपणाऱ्या उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या कार्यशैलीची आठवण यावेळी मुख्यमंत्र्यांनी उपस्थितांना करून दिली.

देशात प्रथमच वकिलांसाठी उभारण्यात आलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रशिक्षण व संशोधन केंद्र (अकादमी)चे उद्घाटन शनिवारी दुपारी तळोजा येथे देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी मुख्यमंत्र्यांनी नुकत्याच अपघातात निधन पावलेल्या अजित पवार यांच्या कार्यपद्धतीचा विशेष उल्लेख करत, सरकारी इमारतींच्या बांधकामात ते स्वतः सकाळी लवकर प्रत्यक्ष पाहणी करून दर्जा तपासत असत, असे सांगितले. अजित पवार यांच्या निधनानंतरचा हा राज्यातील पहिला सार्वजनिक कार्यक्रम असल्याने वातावरण भावनिक होते.

या उद्घाटन सोहळ्यास सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधिश भूषण गवई, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश चंद्रशेखर, मेघालय उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीश रेवती मोहिते ड़ेरे यांच्यासह विविध न्यायमूर्ती आणि राज्यभरातील बार असोसिएशनचे प्रतिनिधी उपस्थित होते. सुमारे वर्षभरापूर्वी या केंद्राचे भूमिपूजन झाले होते.

या अकादमीच्या माध्यमातून वकिलांना प्रत्यक्ष प्रॅक्टिसपूर्वी न्यायालयीन कार्यपद्धती, व्यावसायिक आचारसंहिता, नव्या कायद्यांचे अद्ययावत ज्ञान तसेच देशभरातील महत्त्वाच्या न्यायनिर्णयांचे मार्गदर्शन दिले जाणार आहे. वेगाने बदलणाऱ्या तंत्रज्ञानाच्या पार्श्वभूमीवर एआयचा वापर करून कायदेशीर प्रक्रिया अधिक सक्षम कशा करता येतील, यावरही येथे प्रशिक्षण दिले जाणार आहे.

अकादमीत अत्याधुनिक सुविधा असलेल्या दोन वर्गखोल्या, २५० वकिलांची क्षमता असलेले सभागृह उभारण्यात आले आहे. पुढील आठ महिन्यांत निवासी सुविधा उपलब्ध होणार असून ७५० प्रशिक्षणार्थी बसू शकतील असे दुसरे सभागृह व एम्पी थिएटर उभारण्याचे नियोजन आहे. पुढील विस्तारासाठी राज्य सरकारकडून १० कोटी रुपयांचे अतिरिक्त अनुदान देण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली. गुणवत्तापूर्ण कामासाठी त्यांनी अकादमीच्या बांधकामाचे विशेष कौतुक केले.

### किरकोळ कारणावरून मारहाणीत तरुणाचा मृत्यू

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. ३१ :

पुण्यात किरकोळ वादातून झालेल्या मारहाणीत एका 28 वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला आहे. आरोपींनी जखमी तरुणाला रुग्णालयात न नेता रिक्षातून त्याच्या सोसायटीच्या गेटजवळ सोडून दिले होते. या प्रकरणी भारती विद्यापीठ पोलिसांनी एका आरोपीला सदोष मनुष्यवधाच्या आरोपाखाली अटक केली आहे.

सौरभ संजय शिखरे (वय 28, रा. लुमिनार हाईट्स, आंबेगाव, कात्रज) असे मृत तरुणाचे नाव आहे. गेल्या महिन्यात 25 डिसेंबर रोजी भारती विद्यापीठ परिसरातील एका अंडा भुर्जीच्या गाडीवर सौरभ आणि आरोपी तेजस विकास सणस (वय 19, रा. आंबेगाव, कात्रज) यांच्यात किरकोळ कारणावरून वाद झाला होता. या वादानंतर तेजस सणस आणि त्याच्या तीन साथीदारांनी सौरभ शिखरे याला लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. मारहाणीत सौरभ रस्त्यावर पडला आणि त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. यावेळी सौरभचा मित्र बालाजी कडीर्ले यालाही आरोपींनी मारहाण केली, त्यानंतर तो घाबरून तेथून निघून गेला. आरोपींनी बेशुद्ध अवस्थेतील सौरभला रुग्णालयात नेण्याऐवजी रिक्षाने त्याच्या राहत्या घराच्या गेटजवळ आणून सोडले. त्यानंतर सौरभला खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते.

उपचारादरम्यान 28 जानेवारी रोजी सौरभचा मृत्यू झाला. वैद्यकीय तज्ज्ञांचा अभिप्राय आणि शवविच्छेदन अहवालानंतर पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला. शवविच्छेदन अहवालात सौरभच्या डोक्याच्या उजव्या बाजूस अंतर्गत मार लागल्याचे स्पष्ट झाले. घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेजमध्ये तेजस सणस आणि त्याच्या मित्रांच्या धक्काबुक्कीत सौरभ खाली पडल्याचे दिसून आले.

# पार्थ पवारांनी घेतली शरद पवारांची भेट

■ वृत्तसंस्था, बारामती, दि. ३१ :



मुंबईत सुनेत्रा पवार यांच्या उपमुख्यमंत्रिपदाच्या शपथविधीची तयारी सुरू असताना सकाळी ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी या शपथविधीबाबत मला माहिती नव्हती, विश्वासात घेतले गेले नाही, असे स्पष्ट केल्याने राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली. या वक्तव्यानंतर राजकीय वतुर्ळात अनेक तर्क-वितर्क सुरू झाले. शपथविधीच्या पार्श्वभूमीवर पवार कुटुंबात दुरावा निर्माण झाल्याची चर्चा रंगू लागली. याच दरम्यान पार्थ पवार अचानक शरद पवारांच्या भेटीसाठी गेले. या भेटीतील चर्चा काय झाली, याची सुरुवातीला कोणतीही अधिकृत माहिती समोर आली नाही. पार्थ पवार बैठक संपल्यानंतर माध्यमांशी एक शब्दही न बोलता निघून गेले.

काही वेळानंतर आमदार रोहित पवार आणि युगेंद्र पवार हे दोघे एकाच गाडीतून त्या ठिकाणी पोहोचले. त्यांनीही कोणतीही प्रतिक्रिया न देता बैठकस्थळ सोडले. त्यामुळे राजकीय चर्चांना आणखी उधाण आले. पवार कुटुंबात नेमकं काय घडत आहे, याबाबत उत्सुकता वाढली. मात्र या सर्व घडामोडींनंतर सुमारे तासाभराने महत्त्वाची माहिती समोर आली आणि या संपूर्ण चित्राला नवं वळण .

विद्या प्रतिष्ठानचे विश्वस्त आणि दिवंगत अजित पवार यांचे अत्यंत विश्वासू म्हणून ओळख असलेल्या किरण गुजर यांनी या बैठकीबाबत मोठा दावा केला. गुजर यांच्या माहितीनुसार, पार्थ पवार यांनी शरद पवार यांची भेट घेऊन सुनेत्रा पवार यांच्या शपथविधीचे निमंत्रण दिले. शपथविधीच्या संदर्भात जे समज-गैरसमज निर्माण झाले होते, ते या बैठकीत दूर करण्यात आले. या चर्चेनंतर पवार कुटुंबाने राजकीयदृष्ट्या एकत्र येण्याचा निर्णय घेतला असल्याचा दावा त्यांनी केला.

किरण गुजर यांनी पुढे सांगितले की, त्यांनी स्वतः सकाळी शरद पवार, खासदार सुप्रिया सुळे, आमदार रोहित पवार, पार्थ पवार, युगेंद्र पवार, राजेंद्र पवार आणि रणजीत पवार यांच्या उपस्थितीत झालेल्या चर्चेत सहभाग घेतला होता. या बैठकीनंतर त्यांनी स्वतंत्रपणे सहयोग निवासस्थानी पार्थ पवार यांची भेट घेतली. त्या चर्चेत अजित पवार यांचे दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र आणण्याचे स्वप्न कोणत्याही परिस्थितीत पूर्ण करायचे, असा निर्धार झाल्याचे त्यांनी सांगितले.

## एमआयटीतर्फे भारत अस्मिता राष्ट्रीय पुरस्कार जाहीर

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. ३१ :

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी (एमआयटी डब्ल्यूपीयू) आणि एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंटतर्फे २२ वे भारत अस्मिता राष्ट्रीय पुरस्कार जाहिर करण्यात आले आहेत. प्रा. डॉ. श्रीवर्धनी के. झा, ज्योतिमणी सेन्नीमलाई, पद्मश्री डॉ. मोहन आगाशे आणि पद्मविभूषण उस्ताद अमजद अली खान यांना या वर्षीच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. या पुरस्कारांचे मुख्य उद्दिष्ट विविध क्षेत्रांमध्ये महत्त्वपूर्ण कामगिरी बजावणाऱ्या व्यक्तींच्या कार्याची माहिती तरुण पिढीला देणे आणि त्यांना त्या मार्गावर चालण्याची प्रेरणा देणे हे आहे.

बंगळूर येथील आयआयएमच्या प्रा. डॉ. श्रीवर्धनी के. झा, तरुण खासदार ज्योतिमणी सेन्नीमलाई, सुप्रसिद्ध अभिनेता आणि मानसोपचार तज्ज्ञ पद्मश्री डॉ. मोहन आगाशे आणि सुप्रसिद्ध शास्त्रीय संगीतकार व सरोदवादक पद्मविभूषण उस्ताद अमजद अली खान यांचा यात समावेश आहे. एमआयटी डब्ल्यूपीयूचे कुलगुरू डॉ. आर.एम. चिटणीस यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. यावेळी एमआयटी डब्ल्यूपीयूचे चीफ बिलीफ ऑफिसर डॉ. दत्ता दंडगे उपस्थित होते.

हा पुरस्कार प्रदान समारंभ मंगळवार, ३ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी ४.३० वाजता कोथरूड येथील एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या मैदानात आयोजित करण्यात आला आहे. एमआयटीचे कार्याध्यक्ष डॉ. राहुल कराड यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.

पुरस्कार समितीचे अध्यक्ष ज्येष्ठ शास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर, जगविख्यात संगणक तज्ज्ञ पद्मभूषण डॉ. विजय भटकर आणि एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ कराड यांच्या हस्ते हे पुरस्कार प्रदान केले जातील. प्रत्येक पुरस्काराचे स्वरूप अडीच लाख रुपये रोख, सन्मानपत्र आणि स्मृतिचिन्ह असे आहे.

जागतिक दजार्चे संशोधन, समाजावर शाश्वत प्रभाव निर्मिती, व्यवस्थापन आणि आंत्रप्रेन्युअरशिपसाठी केलेल्या विशेष कार्याबद्दल प्रा. डॉ. श्रीवर्धनी के. झा यांना भारत अस्मिता आचार्य श्रेष्ठ पुरस्कार प्रदान केला जाईल. तामिळनाडू येथील तरुण खासदार ज्योतिमणी सेन्नीमलाई यांना त्यांच्या धडाडीच्या नेतृत्वासाठी आणि सामाजिक कार्यासाठी भारत अस्मिता जन प्रतिनिधी श्रेष्ठ पुरस्काराने गौरवण्यात येईल. चित्रपट आणि वैद्यकीय क्षेत्रातील अद्वितीय कार्याबद्दल पद्मश्री डॉ. मोहन आगाशे यांना, तर सरोद या वाद्यासह भारतीय शास्त्रीय संगीत जगभर पोहोचविल्याबद्दल पद्मविभूषण उस्ताद अमजद अली खान यांना भारत अस्मिता जन जागरण श्रेष्ठ पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. ज्या व्यक्तींनी आपल्या आचार, विचार, कृती आणि सेवेने देशाच्या नावलौकिकात भर घातली आणि देशाला अमूल्य सेवा समर्पित केली, अशा व्यक्तींच्या गौरवासाठी या पुरस्काराची योजना आहे.

### २५ वर्षीय महिलेवर दुर्मीळ ट्यूमर

# टीबीवर यशस्वी उपचार

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. ३१ :



पुण्यात एका २५ वर्षीय महिलेवर प्रसूतीनंतर निदान झालेल्या दुर्मीळ मेसेंटेरिक ट्यूमर आणि पोटाच्या क्षयरोगावर (अॅब्डॉमिनल टीबी) यशस्वी उपचार करण्यात आले. खराडी येथील मदरहुड हॉस्पिटलमधील डॉक्टरांनी हे गुंतागुंतीचे प्रकरण हाताळले, ज्यामुळे महिलेचा जीव वाचला.

या महिलेने ऑक्टोबर २०२४ मध्ये सिझेरियन शस्त्रक्रियेद्वारे एका निरोगी बाळाला जन्म दिला होता. गर्भधारणेदरम्यान तिच्या गर्भाशयावर १० ते १२ सेंटीमीटरचा फायब्रॉइड आढळला होता, जो प्रसूतीदरम्यान काढण्यात आला. मात्र, प्रसूतीनंतर पाच महिन्यांनी तिला पोटात जडपणा, वाढत्या वेदना आणि थकवा जाणवू लागला. नुकतीच प्रसूती झाल्याने हा थकवा सामान्य असल्याचे समजून तिने सुरुवातीला या लक्षणांकडे दुर्लक्ष केले.

वेदना वाढत गेल्याने अखेर तिने वैद्यकीय सल्ला घेतला. तपासणीनंतर डॉक्टरांना तिच्या पोटात तब्बल १८ सेंटीमीटर आकाराची आणि ५२७ ग्रॅम वजनाची एक मोठी गाठ आढळून आली. सुरुवातीला फायब्रॉइडचा संशय होता, परंतु शस्त्रक्रियेदरम्यान ही गाठ गर्भाशयातून नसून आतड्यांना आधार देणाऱ्या मेसेंटेरीमधून आलेली असल्याचे स्पष्ट झाले. ही गाठ अत्यंत दुर्मीळ मेसेंटेरिक ट्यूमर असल्याचे निष्पन्न झाले. त्याचबरोबर तिला पोटाचा क्षयरोगही झाल्याचे निदान झाले, ज्यामुळे हे प्रकरण अधिक गुंतागुंतीचे बनले.

हॉस्पिटलच्या प्रसूती व स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. गौरी जगदाळे यांच्या नेतृत्वाखाली ही गुंतागुंतीची शस्त्रक्रिया पार पडली. त्यांना सल्लागार लॅप्रोस्कोपिक सर्जन डॉ. सुशील देशमुख यांनी मोलाची साथ दिली. डॉक्टरांनी सांगितले की, वेळेत शस्त्रक्रिया झाली नसती तर आतडे आणि प्रमुख रक्तवाहिन्यांवर गंभीर परिणाम होऊन रुग्णाचा जीव धोक्यात येऊ शकला असता. शस्त्रक्रियेनंतर आणि क्षयरोगावरील योग्य उपचारांमुळे रुग्णाची प्रकृती सध्या स्थिर असून ती आता वेदनामुक्त आयुष्य जगत आहे. प्रसूतीनंतर जाणवणाऱ्या सततच्या वेदना किंवा असामान्य लक्षणांकडे दुर्लक्ष न करता वेळीच वैद्यकीय सल्ला घेणे अत्यंत आवश्यक असल्याचा सल्ला तज्ज्ञांनी दिला आहे.

# सत्ता हेच एकमेव सत्य

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३१ :

अजित पवार यांच्या अकाली निधनानंतर आज त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या विधिमंडळ गटनेतेपदी निवड करण्यात आली आहे. यावेळी राष्ट्रवादीचे नेते दिलीप वळसे-पाटील यांनी गटनेते पदाचा प्रस्ताव मांडला तर छगन भुजबळ यांच्याकडून प्रस्तावाला अनुमोदन दिले. थोड्याच वेळात सुनेत्रा पवार या उपमुख्यमंत्री म्हणून शपथ देखील घेणार आहेत. या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी एक व्हिडीओ पोस्ट केला आहे.



सुनेत्रा पवार यांच्या शपथविधीवर अंजली दमानियांची प्रतिक्रिया

सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर दमानिया यांनी एक व्हिडीओ पोस्ट केला आहे. ज्यामध्ये त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. ह्रसत्ता आणि स्वार्थ आता हेच एकमेव सत्य आहे. पूर्ण महाराष्ट्र हळहळत होता, अगदी माज्यासारखी व्यक्ती, जी अजित पवारांविरोधात अगदी टोकाचं लढली, १५ वर्ष मी लढा दिलाङ्क तरी ज्या पद्धतीने त्यांचा अपघात झाला, अतिशय अस्वस्थ, काहीतरी चुकल्यासारखं वाटत होतं. असं व्हायला नको होतं असं वाटत होतं. पूर्ण महाराष्ट्रातील जनता हळहळत होती, आणि अशातच अगदी तीनच दिवसातङ्क काल अस्थी विसर्जन झालं आणि रात्री तिकडून सगळी मंडळी मुंबईला रवाना झाली. का? तर आज उपमुख्यमंत्री पदाची शपथ घ्यायची म्हणून, मला हे कुठेतरी खटकलं, असे अंजली दमानिया म्हणाल्या आहेत.

सत्तेच्या पुढे काहीच नाही. ना भावना आहेत ना आपलेपणा आहे. कुटुंबाला पण नाही आणि त्यांच्याबरोबर काम करणा?या लोकांना देखील नाहीत. इतके वर्ष ज्या व्यक्तीबरोबर काम केलं, इतकी काय घाई झालीकी त्या व्यक्तीला तीन दिवसांत लोटून पुन्हा सत्तेकडे वाटचाल करावी. हे सगळं बघून मन खूप अस्वस्थ झालं.

सत्ता आलीच असती. उपमुख्यमंत्री जर सुनेत्रा पवार झाल्या असत्या तर सगळ्यांनाच पहिली महिला उपमुख्यमंत्री झाल्याचा आनंद झाला असता. पण इतकी घाई न करता थोडसं थांबून हे केलं असतं तर जास्त बरं झालं असतं.

## अपहरण झालेल्या बालिकेची अकोला जिल्ह्यातून सुटका

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३१ :

महिन्यांच्या चिमुरडीचे अपहरण करून पोलिसांना गुंगारा देणाऱ्या टोळीला मुंब्रा पोलिसांनी अत्यंत कौशल्याने बेड्या ठोकल्या आहेत. तब्बल १६०० हून अधिक सीसीटीव्ही फुटेजची तपासणी आणि अहोरात्र घेतलेल्या कष्टांनंतर, अपहरण झालेल्या बालिकेची अकोला जिल्ह्यातून सुखरूप सुटका करण्यात आली आहे. या कारवाईमुळे मुंब्रा पोलिसांच्या चिकाटीचे सर्वत्र कौतुक होत आहे. सलग ६ दिवस दररोज १६ ते १८ तास काम करून पोलिसांनी हा गुन्हा उघडकीस आणला आहे.

२२ जानेवारी २०२६ रोजी संध्याकाळी ६ वाजेच्या सुमारास, मुंब्रा येथील खाडीमशीन रोडवर ही घटना घडली. फिर्यादी फरजाना मन्सुरी या आपल्या दोन मुलींना घेऊन रस्ता ओलांडत असताना, एका अनोळखी महिलेने मदत करण्याच्या बहाण्याने त्यांच्या ३ महिन्यांच्या मुलीला (आफिया) कडेवर घेतले. गर्दीचा फायदा घेत त्या महिलेने बाळासह तिथून पळ काढला. याप्रकरणी मुंब्रा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. ठाण्याचे पोलिस आयुक्त आशुतोष डुंबरे म्हणाले, आरोपी महिलेने पोलिसांची दिशाभूल करण्यासाठी मुंब्रा ते ठाणे प्रवासादरम्यान अनेकदा आपले कपडे, नकाब आणि बाळाचे पांघरूण बदलले होते. एका रिक्षाचालकाचा माग काढत आणि तांत्रिक तपासाच्या आधारे पोलिसांनी प्रथम नसरीन इकलाख शेख या महिलेला ताब्यात घेतल्याचे सांगण्यात आले आहे.

# अजितदादांच्या एक्झिटनंतर 'पॉवर गेम'ला वेग

### विलीनीकरणाचा धसका की सत्तेचा अट्टाहास?

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनाने निर्माण झालेली पोकळी भरून काढण्यासाठी सध्या जी राजकीय 'एक्सप्रेस' धावत आहे, तिने सर्वांच्याच भुवया उंचावल्या आहेत. एका बाजूला अजितदादांच्या अस्थींचे विसर्जनही झालेले नाही, तर दुसरीकडे मुंबईत सत्तेच्या सारीपाटावर नव्या चाली रचल्या जात आहेत. आज संध्याकाळी ५ वाजता सुनेत्रा पवार उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेणार असल्याच्या वृत्ताने खळबळ उडाली आहे. मात्र, या शपथविधीच्या घाईमागे 'विलीनीकरणाची भीती' आणि 'नेत्यांचा वैयक्तिक स्वार्थ' असल्याची चर्चा आता अधिक गडद झाली आहे.



दिपक कैतके

**शरद पवारांचा तो गौप्यस्फोट आणि नेत्यांची धाकधूक!**

आज सकाळी बारामतीत शरद पवारांनी पत्रकार परिषद घेत राजकीय बॉम्ब टाकला. "१२ फेब्रुवारीला दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याची अधिकृत घोषणा होणार होती, तशी चर्चा अजितशी झाली होती," असे सांगत पवारांनी सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला. पवारांच्या या एका विधानाने हे स्पष्ट झाले की, अजितदादांना दोन्ही पक्ष पुन्हा एकत्र आणायचे होते. मात्र, त्यांच्या निधनानंतर ही चर्चा का थांबली? उलट, तातडीने सुनेत्रा पवारांना शपथ देण्याचा निर्णय का घेतला गेला?

राजकीय जाणकारांच्या मते, जर दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आली असती, तर शरद पवारांच्या नेतृत्वाखाली सध्याच्या मंत्र्यांचे महत्त्व कमी झाले असते. हे 'सत्ताधारी' अस्तित्व धोक्यात येऊ नये, म्हणूनच घाईघाईने सुनेत्रा वहिनींचे नाव पुढे करण्यात आल्याचे बोलले जात आहे.

**अंबादास दानवे यांचा तिखट हल्लाः "स्वार्थासाठी थराला जातील!"**

या घडामोडींवर शिवसेनेचे (उबाठा) नेते अंबादास दानवे यांनी अत्यंत गंभीर आणि जहरी टीका केली आहे. दानवे यांनी थेट सुनील तटकरे आणि प्रफुल्ल पटेल यांच्यावर निशाणा साधत म्हटले की, "हे दोन्ही नेते त्यांच्या राजकीय स्वार्थासाठी कोणत्याही स्तराला जाऊन निर्णय घेऊ शकतात. त्यांना ना नात्यांचे सोयरसुतक आहे, ना दुःखाचे गांभीर्य. केवळ आपली खुर्ची टिकवण्यासाठी त्यांनी सुनेत्रा वहिनींना राजकारणाच्या आखाड्यात ओढले आहे." दानवे यांच्या या विधानाने राजकीय वर्तुळात नवा वाद पेटवला आहे.

**'वर्षा'वर ठरली रणनीती; पार्थ पवारांचीही एन्ट्री!**

शुक्रवारी 'वर्षा' बंगल्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत झालेल्या सव्वा तासाच्या बैठकीत ही सर्व रणनीती आखली गेल्याचे समजते. छगन भुजबळ, सुनील तटकरे आणि प्रफुल्ल पटेल यांनी 'राष्ट्रवादीचा कोटा' स्वतःकडेच ठेवण्यासाठी सुनेत्रा पवारांचे नाव लावून धरले. एवढेच नाही, तर सुनेत्रा वहिनींकडे पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्षपद देऊन पार्थ पवार यांना राज्यसभेवर पाठवण्याची तयारीही पूर्ण झाली आहे. म्हणजेच, पवार कुटुंबातील एका गटाला सत्तेत वाटा देऊन आपला गट टिकवण्याचा हा 'फुलप्रूफ' प्लॅन असल्याचे दिसते.

**घाई नेमकी कोणासाठी?**

आजचा शपथविधी हा केवळ रिक्त जागा भरण्यासाठी नसून, तो शरद पवारांच्या 'घरवापसी'च्या प्लॅनला कायमचा सुरुंग लावण्यासाठी घेतलेला निर्णय वाटतो. अजितदादांनी ज्या स्वाभिमानासाठी स्वतंत्र गट उभा केला, तो गट आता पवारांच्या सावलीपासून दूर ठेवण्याचा अट्टाहास काही बड्या नेत्यांमध्ये दिसत आहे. पण प्रश्न हा उरतो की, बारामतीची आणि महाराष्ट्राची जनता या 'पॉवर गेम'ला स्वीकारणार का?

(लेखक हे महासागर मीडिया ग्रुपचे मुंबई येथे मंत्रालय प्रतिनिधी आहेत)

# सिंहस्थ कुंभमेळयात भाविकांच्या सेवेसाठी धावणार ४,५०० बसेस

■ महासागर प्रतिनिधी
नाशिक, दि. ३१ :



आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर, परिवहन पायाभूत सुविधा, बस संचलन, मनुष्यबळ नियोजन तसेच तंत्रज्ञानाच्या वापरावर विचार विनिमय केला जात आहे. कुंभकाळात भाविकांच्या वाहतुकीसाठी साडेचार हजार बसेसचे नियोजन केले जाणार आहे. त्र्यंबकेश्वर, जव्हार फाटा, निमाणी, वणी, नाशिक महामार्ग आदी प्रमुख स्थानकांचे नुतनीकरण करण्यात येणार आहे. मागील कुंभमेळ्याचा अनुभव असणाऱ्या निवृत्त कर्मचाऱ्यांना मानधनावर नियुक्त करण्याचा प्रस्ताव आहे.

कुंभमेळ्यात भाविकांच्या सुलभ व सुरक्षित वाहतुकीसाठी करण्यात येणाऱ्या परिवहन नियोजनाचा आढावा नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाच्या वतीने बैठकीत घेण्यात आला. प्राधिकरण आयुक्त शेखर सिंह यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत राज्य परिवहन महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, महाव्यवस्थापक (वाहतूक) नितीन मैंद, महाव्यवस्थापक दिनेश महाजन, उपमहाव्यवस्थापक चेतन हसबनीस आदी उपस्थित होते.

सिंहस्थ कुंभमेळा २०२७ अंतर्गत प्रस्तावित पायाभूत कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. त्र्यंबकेश्वर, जव्हार फाटा, निमाणी, वणी, नाशिक महामार्ग आदी प्रमुख ठिकाणांवरील एसटी बस स्थानकांच्या नूतनीकरण व काँक्रिटीकरणाबाबत चर्चा करण्यात आली. या कामांना प्रशासकीय मान्यता मिळाली असून लवकरच कार्यादेश देण्यात येणार आहेत. सप्तशृंगी गड येथे भूसंपादन प्रक्रियेमुळे होणारा विलंब टाळण्यासाठी अटींसह निविदा काढण्याच्या शक्यतेवर चर्चा करण्यात आली.

कुंभमेळा काळात नाशिक आणि त्र्यंबकेश्वरमध्ये कोट्यवधी भाविक येण्याचा अंदाज आहे. रेल्वे, रस्ते मार्गाने येणाऱ्या भाविकांना शहरात येण्यासाठी बसेसची व्यवस्था केली जाणार आहे. यासाठी सुमारे ४,५०० बसेस ठेवण्याचे नियोजन असल्याची माहिती एसटी महामंडळाने दिली. या बसेस अंतर्गत व बाह्य वाहनतळ तसेच कसबे सुकेणे, ओढा, खेरवाडी, नाशिकरोड, देवळाली कॅम्प, इगतपुरी रेल्वे स्थानक आदी प्रमुख ठिकाणांवरून त्र्यंबकेश्वर आणि अंतर्गत वाहनतळापर्यंत भाविकांची वाहतूक करतील. बस तैनाती, मार्ग नियोजन व सामग्री पुरवठा व्यवस्थापन याबाबतचे सूक्ष्म नियोजन एसटी महामंडळाच्या केंद्रीय स्तरावर करण्यात येणार असल्याचे निश्चित करण्यात आले.

एसटी महामंडळाचे यांत्रिक व प्रशासकीय पर्यवेक्षण अधिकारी कुंभमेळ्याच्या सहा महिने आधी, जानेवारी २०२७ पासून नाशिक येथे नियुक्त करण्याचा निर्णय घेण्यात आला. स्थानिक भौगोलिक परिस्थिती व कार्यपद्धतीची ओळख करून देण्यासाठी प्रशिक्षण व भूमिका निश्चिती आधीच करण्यात येईल.

बदली झाल्यावरही नियुक्तीची सातत्यता राखण्यात येणार असल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले. प्रत्येक विभागात स्वतंत्र कुंभमेळा कक्ष स्थापन करून प्रशासकीय सूचनांची अंमलबजावणी आणि विभागीय आराखडे सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या. मागील कुंभमेळ्यांचा अनुभव लक्षात घेऊन पूर्वी कुंभमेळ्यात कार्य केलेल्या निवृत्त राज्य परिवहन कर्मचाऱ्यांना मानधन अथवा करार पद्धतीने नियमानुसार सहभागी करून घेण्याच्या प्रस्तावावर चर्चा करण्यात आली. कुंभमेळा कालावधीत वाहतूक नियोजन अधिक प्रभावी करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता व सिम्युलेशन तंत्रज्ञानाच्या वापरातून प्रवासी मागणी विश्लेषण व मार्ग नकाशा तयार करण्याच्या शक्यतांचा अभ्यास करण्याचे निश्चित करण्यात आले.



# जनावरांच्या वादातून वृद्धाची निर्घृण हत्या

## आरोपीला अटक, वलगाव परिसरात संतापाची लाट



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 31)–** वलगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका साध्या वादाने भयंकर रूप घेतले. 58 वर्षीय छोटेलाल महादेवराव हरदो हे आपल्या शेतात जनावरे नेण्यासाठी गेले असताना, शाहरुख नावाच्या तरुणाने त्यांच्यावर हल्ला करून ठार केले. आरोपीने पोलीस चौकशीत स्वत:च गुन्ह्याची कबुली दिली आहे. संपूर्ण गावात या घटनेने संताप आणि भीतीचे वातावरण निर्माण केले आहे. या घटनेनंतर शनिवारी दुपारी अमरावती शहरातील शवविच्छेदन गृहासमोर नातेवाईकांचा संताप पाहायला मिळाला.

शुक्रवारी सकाळी शेतात जनावरे नेण्यावरून छोटेलाल आणि शाहरुख यांच्यात वाद झाला. दिवसात हा वाद फक्त शब्दांपुरता मर्यादित होता, पण दुपारी वलगाव पोलीस ठाण्याजवळील महाविद्यालय परिसरात भांडण उफाळून आले. पोलिसांपर्यंत तक्रार पोहोचली, पोलिसांनी अदखलपात्र गुन्हा नोंदविला. तरी, रात्री शाहरुखने संधी साधून वृद्ध शेतकऱ्यावर हल्ला केला. त्यानंतर संशयास्पद मृत्यूची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. आरोपी शाहरुखला ताब्यात घेतले असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. पोलीस सध्या सखोल पुरावे गोळा करत आहेत, तर मृतदेहाची उत्तरीय तपासणी अहवालाची वाट पाहत आहेत.

### महाविद्यालय परिसरात वादाची ठिणगी

वलगाव पोलीस ठाण्याजवळील महाविद्यालय परिसरात ही रक्तरंजित घटना घडल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. सकाळी झालेल्या शाब्दिक चकमकीचे गांभीर्य लक्षात न आल्यामुळे ही घटना भयंकर रूप धारण झाली.

### मृतदेह न उचलण्याचा पावित्रा

शनिवारी शवविच्छेदन गृहासमोर नातेवाईकांसह प्रहारचे छोटु महाराज वसू हे पोहोचले. त्यांनी नातेवाईकांची समजुत काढण्याचा प्रयत्न केला. परंतू या घटनेतील दोषींवर कारवाई करण्याची मागणी रेटून धरण्यात आले. जोपर्यंत कारवाई करण्यात येणार नाही, तोपर्यंत मृतदेह उचलणार नाही, असा पावित्रा नातेवाईकांनी घेतला होता. दरम्यान पोलिसांनी नातेवाईकांची समजुत काढली.

### अमरावती शहरातील शवविच्छेदन गृहासमोर तणाव

गावकऱ्यांनी आरोपीवर कठोर कारवाई करण्याची मागणी जोरात लावली आहे. शनिवारी अमरावती येथील जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या शवविच्छेदन गृहासमोर नातेवाईकांचा मोठा गोंधळ पाहायला मिळाला. छोटेलाल यांना मारहाण केल्यानंतर पोलीस तपासास सुरुवात केली, पण नातेवाईकांचा संताप वाढला. डीसीपी गणेश शिंदे यांनी नातेवाईकांची समजुत घातली. दरम्यान तणावाची स्थिती पाहता पोलिसांचा मोठा ताफा तैनात करण्यात आला.

# राजकीय हालचालींना वेग, उमेदवार अद्याप गुलदस्त्यात

## गटनेते निश्चित; महापौराच्या नावावर गोपनीयता



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.31)–** अमरावती महानगरपालिकेच्या महापौर निवडणुकीसाठी राजकीय वातावरण तापू लागले आहे. सर्व प्रमुख राजकीय पक्षांनी आपापले गटनेते निश्चित करून संघटनात्मक तयारी पूर्ण केली असली, तरी निवडणुकीची तारीख जवळ येऊनही अद्याप कोणत्याही पक्षाने अधिकृत उमेदवार जाहीर केलेला नाही. त्यामुळे शेवटच्या क्षणापर्यंत दावेदारांची नावे गुप्त ठेवण्याची रणनीती अवलंबली जाणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.

महापालिका निवडणुकीनंतर गटनेते नियुक्त झाल्याने महापौर निवडणुकीसाठी प्राथमिक तयारी पूर्ण झाल्याचे चित्र आहे. मात्र अद्याप एकाही इच्छुकाने अधिकृतपणे नामनिर्देशन अर्ज दाखल केलेला नाही. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, विविध पक्षांतर्गत बैठका, चर्चा आणि वरिष्ठ पातळीवर मंथन सुरू असून संख्याबळ, मित्रपक्षांचा पाठिंबा आणि स्थानिक राजकीय समीकरणांचा अभ्यास केला जात आहे.

दरम्यान, राज्यात जाहीर झालेल्या शासकीय दुखवट्यामुळे काही काळ राजकीय हालचालींना विराम लागला होता. मात्र हा कालावधी समाप्त होताच पुन्हा एकदा सर्व पक्षांचे लक्ष महापौर निवडणुकीकडे केंद्रित झाले आहे.

परंपरेनुसार शेवटच्या क्षणी नामनिर्देशन दाखल होण्याची शक्यता असून, येत्या एक-दोन दिवसांत उमेदवारांची नावे स्पष्ट होणार आहेत. नगर विकास विभागाने निवडणुकीसाठी सर्व प्रशासकीय तयारी पूर्ण केली असून, 6 फेब्रुवारी रोजी मतदान व त्यानंतर मतमोजणी होणार आहे.

### महापौर पदासाठी 7 जणांनी नामनिर्देशन पत्रे उचलली

महापौर पदाच्या निवडणुकीसाठी आतापर्यंत एकूण सात जणांनी नामनिर्देशन पत्रे उचलली आहेत. यामध्ये भाजपच्या नगरसेविका लता रावसाहेब देशमुख, शिवसेना (शिंदे गट) स्नेहा आशिष लुल्ला, काँग्रेसकडून डॉ. संजय शिरभाते (दोन पत्रे), एमआयएमचे सैय्यद राशीद अली सै. शौकत अली व नजीब खान करीम खान तसेच बीएसपीचे नगरसेवक इस्माईल कासम लालुवाले यांचा समावेश आहे. नामांकन दाखल झाल्यानंतर निवडणुकीचे चित्र अधिक स्पष्ट होणार आहे.

# सायन्स्कोर शाळेच्या साहित्य गोडाऊनला मध्यरात्री भीषण आग


## बेंच, लाकडी व शैक्षणिक साहित्य जळून खाक; एका कर्मचाऱ्याचे घरही बाधित

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.31)–** अमरावती शहरातील जिल्हा परिषद विश्रामगृह परिसरात असलेल्या सायन्स्कोर शाळेच्या साहित्य गोडाऊनला शुक्रवारी (दि. 30) मध्यरात्री 1 ते 2 वाजताच्या सुमारास अचानक भीषण आग लागली. या आगीत गोडाऊनमधील शाळेतील बेंच, लाकडी साहित्य तसेच विविध शैक्षणिक साहित्य पूर्णत: जळून खाक झाले.

प्राथमिक माहितीनुसार, सुरुवातीला आग किरकोळ स्वरूपाची होती; मात्र जोरदार वाऱ्यामुळे काही क्षणांतच तिने उग्र रूप धारण केले. त्यामुळे गोडाऊनमधील बहुतांश साहित्य नष्ट झाले. या आगीत झालेल्या आर्थिक नुकसानीचा नेमका अंदाज अद्याप प्रशासनाकडून जाहीर करण्यात आलेला नाही.

आग लागल्याची माहिती मिळताच अमरावती महानगरपालिका अग्निशमन दलाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पाळी प्रमुख सुनील काकडे यांच्या



मार्गदर्शनाखाली अग्निशमन दलाच्या पथकाने रात्रीच्या अडचणींवर मात करत बचावकार्य सुरू केले. सुमारे तीन तासांच्या अथक प्रयत्नांनंतर जवळपास नऊ अग्निशमन वाहनांच्या मदतीने आग आटोक्यात आणण्यात यश आले. या घटनेत जिल्हा परिषदेचे काही जुने साहित्य तसेच एका कर्मचाऱ्याचे घर जळून खाक झाले. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. दरम्यान, गोडाऊनमधील गॅस सिलेंडर वेळीच बाहेर काढल्याने मोठा अनर्थ टळला. आगीचे नेमके कारण शोधण्यासाठी पोलीस व अग्निशमन विभागाकडून तपास सुरू आहे.

### जिनिंग फॅक्टरीत इसमाची गळफास घेऊन आत्महत्या

**अंजनगाव सुर्जी –** शहरातील जूना बसस्थानक परिसरात असलेल्या एका जिनिंग फॅक्टरीत इसमाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना बुधवारी रात्री उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली असून नागरिकांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे. बुधवारा परिसरातील रहिवासी विनायक श्रीराम लोळे (वय अंदाजे 50) यांनी रात्री सुमारे 11 ते 12 वाजताच्या दरम्यान संबंधित जिनिंग फॅक्टरीच्या आवारात गळफास घेऊन जीवन संपवले.

# आसामचा कुख्यात चोर चांदूर रेल्वेत गजाआड

## 6.48 लाखांचा मुद्देमाल जप्त; गुन्हे शाखेची यशस्वी कारवाई

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.31)–** बडनेरा जुन्या वस्तीतील चक्रधर बॉडी मेकर व वेल्डिंग दुकानात चोरी करणाऱ्या आसामच्या कुख्यात चोराला गुन्हे शाखेने चांदूर रेल्वे रोड परिसरातून अटक केली. कमलेश रॉय जॉयराम रॉय (वय 32, रा. राजाबाजार, सिमला गुरी, सिडल, जि. चिरांग, आसाम) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याच्याकडून चारचाकी वाहन, चार बॅटऱ्या व रोख 500 रुपये असा एकूण 6 लाख 48 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

काही दिवसांपूर्वी आरोपीने वेल्डिंगचे काम येते, अशी बतावणी करत दुकानात प्रवेश मिळवला. नोकरीची इच्छा दर्शवून व गावातील मुलाला पैसे पाठवायचे असल्याचे कारण सांगत त्याने 4,000 रुपये मागितले. याच संधीचा फायदा घेत त्याने चोरीची योजना आखली. आरोपी हा सराईत चोर व लुटारू असून अमरावती शहरासह आसाम राज्यात त्याच्यावर यापूर्वीही अनेक गुन्हे दाखल आहेत. स्थायी पत्ता नसल्याने तो विविध शहरांत गुन्हे करत असल्याचे तपासात उघड झाले. दरम्यान, 31 जानेवारी रोजी गुन्हे शाखेला आरोपी चोरीची गाडी घेऊन आसामकडे पळून जाणार असल्याची गुप्त माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने चांदूर रेल्वे रोडवरील 500 क्वार्टर्सजवळ सापळा रचून आरोपीला वाहनासह ताब्यात घेतले. चौकशीत त्याने अमरावती शहरातील दोन वाहनचोरीचे गुन्हे कबूल केले.

ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली उपायुक्त गणेश शिंदे, श्याम घुगे, रमेश धुमाळ व सहाय्यक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या देखरेखीखाली, पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण व सीमा दाताळकर यांच्या नेतृत्वाखाली गुन्हे शाखेच्या पथकाने केली.

### हरविलेले 10 मोबाईल शोधून मूळ मालकांना परत

**अमरावती –** नागपुरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीत हरविलेले मोबाईल शोधण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या सेंन्ट्रल इक्विपमेंट आयडन्टी रजिस्टर या पोर्टलच्या माध्यमातून पोलिसांनी यशस्वी कारवाई करीत तब्बल 10 मोबाईल फोन शोधून हस्तगत केले असून, ते मूळ अर्जदारांना परत करण्यात आले आहेत.

नागपुरी गेटचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हनमंत उरलागोंडावार यांच्या आदेशानुसार नेमण्यात आलेल्या अंमलदारांनी पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या हरविलेल्या मोबाईल तक्रारींचे बारकाईने अवलोकन करून शोध मोहीम राबवली. या मोहिमेदरम्यान विविध कंपन्यांचे एकूण 10 मोबाईल फोन शोधून काढण्यात पोलिसांना यश आले. हस्तगत करण्यात आलेल्या मोबाईलमध्ये विवो, रेडमी, रिअलमी व टेक्नो कंपन्यांचे मोबाईल असून, त्यांची अंदाजे एकूण किंमत 1 लाख 50 हजार रुपये आहे.

# सामूहिक अत्याचार प्रकरणी दोघांना 10 वर्षांचा सश्रम कारावास

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 31) –** अमरावती जिल्हा व सत्र न्यायालयाने सन 2017 मधील सामूहिक लैंगिक अत्याचाराच्या अमानुष प्रकरणात दोघा आरोपींना दोषी ठरवले आहे. जिल्हा व सत्र न्यायाधीश यशवंत आनंद गोस्वामी यांनी आरोपी खंडू किसन जाधव (वय 43) व राहुल जाधव (वय 30, रा. अमरावती) यांना प्रत्येकी 10 वर्षांचा सश्रम कारावास व 15 हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे.

विधी सूत्रांनुसार, 29 जानेवारी 2017 रोजी 50 वर्षीय महिला रस्त्याने जात असताना आरोपी राहुल जाधव दुचाकीवर आला. विश्वासाचा गैरफायदा घेत 'सोडून देतो' असे सांगत त्याने महिलेला दुचाकीवर बसवले. काही अंतरावर दुसरा आरोपी खंडू जाधव दुचाकीवर बसला. त्यानंतर दोघांनी पीडित महिलेला हिंदू स्मशानभूमी परिसरात नेऊन तिच्यावर सामूहिक लैंगिक अत्याचार केला व निर्घृण मारहाण केली. अत्याचाराच्या अमानुषतेमुळे पीडिता बेशुद्ध पडली. शुद्धीवर आल्यानंतरही धैर्याने पीडिता एकटीच अंबादेवी मंदिर परिसरात पोहोचली व रात्रभर तेथेच राहिली. दुसऱ्या दिवशी पती घटनास्थळी आल्यानंतर संपूर्ण प्रकार उघडकीस आला. त्यानंतर 30 जानेवारी 2017 रोजी सिटी कोतवाली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. पोलिसांनी विविध गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल करून सखोल तपास केला. न्यायालयात आरोपपत्र दाखल झाल्यानंतर सरकारी पक्षाने 13 महत्त्वाचे साक्षीदार सादर केले. साक्षी, वैद्यकीय अहवाल व इतर ठोस पुराव्यांच्या आधारे न्यायालयाने दोन्ही आरोपी दोषी असल्याचे स्पष्ट करत कठोर शिक्षा सुनावली. या खटल्यात सहायक सरकारी वकील सोनाली क्षीरसागर यांनी प्रभावी व ठामपणे सरकारी पक्षाची बाजू मांडली.

# नगरपरिषद निवडणुकीआधीच्या 18 कोटींच्या विकासकामांना ब्रेक!

## निविदा प्रक्रिया रद्द; केवळ एकच काम 'जैसे थे' शहरवासीयांच्या विकासाच्या स्वप्नांवर पाणी फेरले ?

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे, (दि. 31)–** नगरपरिषद निवडणुकी आधीच्या चांदूर रेल्वे शहरातील 18 कोटींच्या विकासकामांना ब्रेक लागल्याची विश्वसनीय माहिती प्राप्त झाली आहे. सदर संपुर्ण निविदा प्रक्रिया रद्द झाली असुन केवळ एकच काम 'जैसे थे' ठेवण्यात आल्याचे समजते. यामुळे शहरवासीयांच्या विकासाच्या स्वप्नांवर पाणी फेरले का ? अशी चर्चा सुरू आहे.




विधानसभा निवडणुकीपूर्वी शहरातील विविध विकासकामांसाठी आमदार प्रताप अडसड यांच्या प्रयत्नातून सुमारे 18 कोटी रुपयांचा विकास निधी मंजूर करण्यात आला होता. नगरपरिषदेचे कामकाज प्रशासकीय नियंत्रणात असल्याने सुरुवातीला ही कामे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत तांत्रिक मान्यता घेऊन निविदा प्रक्रियेत टाकण्यात आली होती. मात्र नगरपरिषद निवडणुकीचे वारे वाहू लागल्यानंतर अचानक सार्वजनिक बांधकाम विभागाची निविदा प्रक्रिया रद्द करून ही सर्व कामे नगरपरिषदेच्या अखत्यारित वळविण्यात आली.

त्यानंतर नव्याने तब्बल 18 कोटी रुपयांच्या विकासकामांसाठी नगरपरिषदेतर्फे ऑनलाईन निविदा मागविण्यात आल्या.

या निविदा प्रक्रियेत काही ठेकेदारांकडून निविदा मॅनेज करण्याचे प्रयत्न सुरू असल्याची खमंग चर्चा शहरात रंगली होती. मात्र ठेकेदारांमध्ये एकमत न झाल्याने आणि दरम्यान निवडणूक आचारसंहिता लागू झाल्यामुळे निविदा उघडता आल्या नाहीत, परिणामी शहरातील विकासकामांचे भूमिपूजनच रखडले. यानंतर शुक्रवारी (ता. 30) नगरपरिषद बांधकाम विभागाकडून ऑनलाईन निविदा धारकांना मेलद्वारे निविदा रद्द झाल्याचा संदेश देण्यात आल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे.

### ठेकेदारांच्या तक्रारीमुळे निविदा रद्द

नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी सुप्रिया टवलारे यांनी याबाबत माहिती देताना सांगितले की, नगरपरिषदेकडून काढण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत काही ठेकेदारांच्या तक्रारी आल्या असून काही कामांसाठी अपूर्ण निविदा प्राप्त झाल्या. त्यामुळे सदर निविदा प्रक्रिया रद्द करण्यात आली आहे. नव्याने निविदा प्रक्रिया राबविण्यात येईल. मागील निविदेतील एका कामाचे कागदपत्र पडताळणी सुरू असून त्यावर लवकरच निर्णय घेतला जाईल. हा संपूर्ण निधी शहराच्या विकासासाठीच वापरण्यात येणार आहे.

**सुप्रिया टवलारे, मुख्याधिकारी**

### नवीन व सुशिक्षित ठेकेदारांचे आर्थिक नुकसान, निविदा फी परत मिळावी -सुशिक्षित अभियंता संघटनेची मागणी

सुशिक्षित अभियंता संघटनेचे अध्यक्ष अतुल शिरभाते व सचिव कशिश शर्मा यांनी प्रतिक्रिया देतांना म्हटले की, चांदूर रेल्वे नगरपरिषदेत ऑनलाईन निविदा प्रक्रियेत जाचक अटी टाकण्यात आल्या. त्यामुळे नवीन व सुशिक्षित ठेकेदारांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. एका कामासाठी निविदा खरेदी 1500 रुपये, स्टॅम्प ड्युटी 700 रुपये, नोटरी फी. 300 रुपये असा किमान 2500 रुपयांचा खर्च येतो. एखाद्या ठेकेदाराने 10 ते 15 निविदा भरल्या असतील तर 25 ते 30 हजार रुपयांचा फटका बसतो. त्यामुळे निविदा फी परत देण्यात यावी.

### नगरपरिषद निवडणुकीच्या राजकारणात शहराचा विकास अडकला की काय ?

18 कोटींच्या विकासकामांची निविदा प्रक्रिया रद्द होणे हे प्रशासन, राजकारण आणि ठेकेदारी व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे ठरत असून, आता शहरवासीयांचे लक्ष नव्या निविदा प्रक्रिया व प्रत्यक्ष कामे कधी सुरू होणार ? याकडे लागले आहे.

# अपघातांना आळा घालण्यासाठी वाहतूक पोलिसांची हेल्मेट जनजागृती रॅली

## हेल्मेट वापरा, जीव वाचवा संदेशासह शहर-ग्रामीण पोलिसांचा संयुक्त उपक्रम

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.31)–** अमरावती जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून रस्ते अपघातांची संख्या वाढत असून, दररोज एक ते दोन नागरिकांचा अपघातात मृत्यू होत असल्याच्या घटना समोर येत आहेत. वाढती जीवितहानी लक्षात घेता वाहतूक नियमांचे काटेकोर पालन अत्यावश्यक ठरत असले, तरी हेल्मेट सक्तीबाबत अद्याप अधिकृत निर्णय झालेला नाही. या पार्श्वभूमीवर अमरावती शहर व ग्रामीण पोलिसांनी नागरिकांमध्ये वाहतूक सुरक्षेबाबत जनजागृती करण्यावर भर दिला आहे.



शनिवारी अमरावती शहरात वाहतूक पोलिसांनी हेल्मेट परिधान करून भव्य जनजागृती रॅली काढली. या रॅलीत सहभागी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी स्वत: हेल्मेट घालून दुचाकीवरून शहरातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण केले. हेल्मेट वापरा, जीव वाचवा, नियम पाळा, सुरक्षित राहा अशा घोषणांद्वारे नागरिकांचे लक्ष वेधण्यात आले.

यापूर्वीही अमरावती ग्रामीण पोलिसांनी अशाच स्वरूपाची बाईक रॅली काढून वाहतूक नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले होते. शहर व ग्रामीण पोलिसांकडून सातत्याने राबविण्यात येत असलेल्या या उपक्रमांमुळे हेल्मेट वापराविषयी सकारात्मक जनजागृती होत असल्याचे चित्र आहे.

ही रॅली पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलिस उपायुक्त गणेश शिंदे व श्याम घुगे यांच्या नेतृत्वात आयोजित करण्यात आली. वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक ज्योती विल्हेकर, रिता उईके व प्रविण वांगे यांनी मोहिमेची अंमलबजावणी केली. वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी स्वत:हून हेल्मेट वापरणे व वाहतूक नियमांचे पालन करावे, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# टॅगच्या आड तस्करीचा खेळ

## ■ सीमावर्ती भागात प्रशासनाची डोळेझाक
## ■ महाराष्ट्र-मध्य प्रदेश सीमेवर गोवंश तस्करीला उधाण

**बादल डकरे**

**चांदुर बाजार,( दि.31 ) -** महाराष्ट्र-मध्य प्रदेश सीमेवर सध्या गोवंश तस्करीचा गंभीर आणि धक्कादायक प्रकार उघडकीस येत असून, तथाकथित टॅग तंत्रज्ञानाच्या आड हा अवैध व्यवसाय बिनधास्त सुरू असल्याचे चित्र आहे. बनावट टॅग लावून जनावरांची वाहतूक केली जात असून, कत्तल झाल्यानंतर तेच टॅग पुन्हा अन्य गोवंशाच्या गळ्यात अडकवले जात असल्याची माहिती समोर येत आहे. विशेष म्हणजे, हा सगळा प्रकार प्रशासनाच्या नाकावर टिच्चून सुरू असल्याने चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.







सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, काही ठिकाणी खाजगी पशुवैद्यकीय डॉक्टर प्रति गौवंश अवघ्या 50 रुपयांत टॅग लावून देत असल्याचा आरोप आहे. पशुसंवर्धनाची जबाबदारी ज्यांच्यावर आहे, त्यांच्याच माध्यमातून नियमांची पायमल्ली होत असल्याचे दिसून येते. हा एखादा अपवादात्मक प्रकार नसून, महाराष्ट्र-मध्य प्रदेश सीमेवर कार्यरत असलेल्या मोठ्या आणि संघटित रॅकेटचे संकेत यातून मिळत आहेत.

प्रशासनाकडून टॅग खरे की बनावट, याची चौकशी केली जाईल, असे सांगितले जात असले तरी प्रत्यक्ष कारवाईला होत असलेला विलंब अनेक प्रश्न निर्माण करतो. कृषी उत्पन्न बाजार समित्या तसेच जनावरांच्या खरेदी-विक्रीची केंद्रे येथे गौवंशाच्या टॅगची कोणतीही ठोस तपासणी होत नसल्याचे उघड झाले आहे. कागदोपत्री कायदे कडक असले, तरी प्रत्यक्ष अंमलबजावणीत मोठी पोकळी असल्याचे स्पष्ट होत आहे. दरम्यान, चांदुर रेल्वे पोलिसांनी केलेल्या दोन कारवायांमुळे या टॅग गैरप्रकाराचा पर्दाफाश झाला. या कारवायांमुळे आतापर्यंत सगळे काही कायदेशीर आहे असा आव आणणाऱ्यांची पोलखोल झाली आहे. मात्र, या काही अपवादात्मक कारवाया वगळता उर्वरित यंत्रणा नेमकी कुठे होती, असा सवाल उपस्थित केला जात आहे. पशुसंवर्धन विभाग व पोलीस प्रशासनाकडून या गंभीर प्रकाराकडे होत असलेले दुर्लक्ष केवळ निष्काळजीपणाचे नसून संशयास्पदही मानले जात आहे. गोवंश संरक्षणाच्या मुद्द्यावर राजकारण तापवले जाते, मात्र प्रत्यक्षात तस्करांचेच फावत असल्याचे चित्र दिसत आहे. आता तरी महाराष्ट्र व मध्य प्रदेश सरकारांनी या प्रकरणाची गंभीर दखल घ्यावी. बनावट टॅग, भ्रष्ट साखळी आणि सीमावर्ती भागात फोफावलेल्या गौवंश तस्करीवर ठोस, पारदर्शक आणि कठोर कारवाई झाली नाही, तर गोवंश संरक्षण हे केवळ घोषणांपुरतेच मर्यादित राहील, अशी भीती व्यक्त होत आहे.

### अनेक गोवंश टॅग विना

ब्राम्हणवाडा थडी पोलिसांनी नुकत्याच केलेल्या कारवाईत अवैध गोवंश तस्करीप्रकरणी अनेक जनावरांना टॅग नसल्याचे आढळून आले. त्यामुळे सीमावर्ती भागात टॅगच्या नावाखाली सुरू असलेला गैरप्रकार प्रत्यक्षात अस्तित्वात असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

# सावंगा (विठोबा) तीर्थक्षेत्र विकासाकडे शासनाचे दुर्लक्ष?

## कापुराची यात्रा, लाखो भाविक; रस्ते, एसटी, पूल व सुविधा अपुऱ्या

### संस्थानचा सातत्याने पाठपुरावा

**रवि कलाने**

**चांदूर रेल्वे,( दि.31 )-** महाराष्ट्रात 450 ते 500 वर्षांची परंपरा लाभलेले श्री विठोबा संस्थान ऊर्फ श्रीकृष्ण अवधूत बुवा संस्थान, श्रीक्षेत्र सावंगा (विठोबा) हे लाखो भाविकांचे श्रद्धास्थान आहे. मात्र, दरवर्षी 15 ते 16 लाख भाविक दर्शनासाठी येत असतानाही येथे मूलभूत सोयी-सुविधांचा अभाव असून शासन विकासाकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप संस्थानकडून करण्यात आला आहे.





गुढीपाडवा व दसरा यात्रेला दरवर्षी 72 फूट उंचीच्या दोन झेंड्यांवर नवीन कापड चढविण्याचा भव्य सोहळा होतो. गुढीपाडव्याच्या दिवशी एकाच दिवसात 5 ते 6 लाख भाविक उपस्थित राहतात. शेकडो क्विंटल कापूर जाळला जात असल्याने ही यात्रा 'कापुराची यात्रा' म्हणून ओळखली जाते. श्रावण, कार्तिक, पौष व चैत्र महिन्यांत 30 ते 45 दिवस अखंड भजन, दर अमावास्येला चंदनउटी तसेच दर बुधवार व रविवारला हजारो भाविक दर्शनासाठी येतात.

मात्र, एसटी बससेवेचा अभाव मोठी समस्या ठरत आहे. चांदूर रेल्वे व अमरावती येथून बस फेऱ्यांसाठी तीन वर्षांपासून पाठपुरावा करूनही सेवा अनियमित आहे.

परिणामी भाविकांना खाजगी वाहनांवर अवलंबून राहावे लागते. सावंगा विठोब्याकडे जाणारे मांजरखेड, लालखेड, मोगरा व सावंगा फाटा येथील रस्ते नादुरुस्त व अपघातप्रवण झाले आहेत. गावाशेजारील खोलाड नदीच्या पुलाला कठडे नसल्याने धोका वाढला आहे. यात्राकाळात वाहतूक 4 ते 5 तास ठप्प होते.

शासनाने तीर्थक्षेत्रास 'ब' दर्जा दिला असला तरी अपेक्षित विकास झालेला नाही. निधीतून उभारलेले स्त्री भक्तनिवास ग्रामपंचायतीच्या अधिनस्त असल्याने पूर्ण क्षमतेने वापरात नाहीत. कृष्णाजी सागर तलावापासून थेट पूल बांधल्यास अंतर 9 किमीवरून 3 किमी होऊन पर्यटनास चालना मिळू शकते, असे संस्थानचे मत आहे.

> सध्यस्थितीत संस्थानच्या वतीने भाविकांना मूलभूत सुविधा पुरविण्यासाठी केवळ भाविकांच्या देणगीचा वापर केला जात आहे, यातूनच संस्थानने दोन वर्षापासून सुरु केले प्रसादालय भाविकांच्या सेवेत आहे.संस्थानचा विकास केवळ भाविकांच्या देणगीतून केला जात असून शासनाकडून अद्याप ठोस अशी कोणतीही विकासात्मक कार्यवाही नाही.
>
> **पुंजाराम नेमाडे अध्यक्ष,**
> **श्री विठोबा संस्थान, सावंगा ( विठोबा ).**

# नेत्रतज्ज्ञ सीमा तोष्णीवाल यांचा समाजाभिमुख आदर्श उपक्रम

### कन्येच्या वाढदिवसानिमित्त शाळकरी विद्यार्थ्यांना शैक्षणिक व आरोग्यपूरक मदत




**महासागर प्रतिनिधी**

**चांदुर रेल्वे, ( दि. 31 ) -** समाजाप्रती आपली जबाबदारी जपणाऱ्या व्यक्ती आजही समाजात आहेत, याचे प्रेरणादायी उदाहरण म्हणजे सोलापूर येथील प्रसिद्ध नेत्रतज्ज्ञ सीमा सत्यश्याम तोष्णीवाल. समाज आपल्याला देत असतो, म्हणून आपणही समाजाला देणं लागतो या विचारातून त्या सातत्याने समाजोपयोगी उपक्रम राबवत असतात. आपल्या कन्या सौम्या सत्यश्याम तोष्णीवाल (एमबीबीएस डॉक्टर) यांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षी सामाजिक उपक्रम राबविण्याची त्यांची परंपरा आहे. यंदा त्यांनी जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा, मालखेड रेल्वे येथील विद्यार्थ्यांसोबत वाढदिवस साजरा करण्याचा निर्णय घेतला. शाळेतील शिक्षिका तृप्ती शिंगणवाडे यांच्या विनंतीनुसार त्यांनी 12 हजार रुपयांची देणगी शाळेस दिली.

या देणगीतून 88 विद्यार्थ्यांना स्टीलचे डबे व रंगकांड्या वाटप करण्यात आल्या. आरोग्याच्या दृष्टीने प्लास्टिकऐवजी स्टीलचा वापर व्हावा, हा या उपक्रमाचा उद्देश होता. प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून कार्यक्रम पार पडला. या उपक्रमाबद्दल शाळा प्रशासन व पालकवर्गाने त्यांचे आभार मानले. मराठी शाळा जिवंत राहिली पाहिजे हा विचार प्रत्यक्षात उतरल्याचे यावेळी दिसून आले.

# विद्याविहार महिला महाविद्यालयात प्रजासत्ताक दिन

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,( दि.31 )-** दृष्टी सामाजिक शिक्षण संस्था, वर्धा संचालित व एसएनडीटी महिला विद्यापीठाशी संलग्न विद्याविहार महिला महाविद्यालय, वरुड येथे 26 जानेवारी 2026 रोजी प्रजासत्ताक दिन उत्साहात व देशभक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. भारत भारती होते. प्रमुख पाहुणे म्हणून रुपेश नारिंगे तर प्राचार्या प्रा. मनीषा मगरदे यांची विशेष उपस्थिती लाभली. मान्यवरांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना भारतीय संविधानाचे महत्त्व, लोकशाही मूल्ये, स्त्रीशिक्षणाची भूमिका तसेच राष्ट्रउभारणीत युवक-युवतींचा सक्रिय सहभाग यावर प्रकाश टाकला. प्रजासत्ताक दिनानिमित्त विद्यार्थिनींनी देशभक्तीपर भाषणे सादर केली. विविध सांस्कृतिक कार्यक्रमांतून राष्ट्रप्रेम, एकता व सामाजिक बांधिलकीचे प्रभावी दर्शन घडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. पूनम गावंडे यांनी केले. प्रास्ताविक प्रा. अश्विनी धोटे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. शीतल मुंडे यांनी केले.



# बुंदेलपुरा येथील नागरी समस्यांविरोधात शिवसेना आक्रमक

## उपविभागीय अधिकारी, नगराध्यक्ष व मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर,( दि.31 ) -** शहरातील क्षेत्रफळाने व लोकसंख्येने मोठ्या असलेल्या बुंदेलपुरा नागरी वस्तीतील विविध मूलभूत नागरी समस्यांविरोधात शिवसेनेने आक्रमक भूमिका घेतली आहे. शिवसेना शहरप्रमुख आतिश अहिर यांच्या नेतृत्वाखाली अचलपूरचे उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव, नगराध्यक्ष रूपाली अभय माथने व मुख्याधिकारी धीरजकुमार गोहाळ यांना स्थानिक नागरिकांच्या उपस्थितीत लेखी निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनात बुंदेलपुरा परिसरातील अत्यंत खराब रस्ते, बंद पडलेले पथदिवे, नादुरुस्त हँडपंप आदी समस्यांकडे लक्ष वेधण्यात आले. लक्ष्मीनारायण मंदिर ते गवळीपुरा राम मंदिर या मार्गावरील रस्त्याचे काम तातडीने सुरू करावे, तसेच लक्ष्मीनारायण मंदिर, भुजेरिया चौक गवळीपुरा व शीतला माता मंदिर (ठाकूरपुरा) येथे हायमॅक्स लाईट बसविण्याची मागणी करण्यात आली. लक्ष्मीनारायण मंदिर परिसरातील बंद पडलेल्या हँडपंपला नव्याने कनेक्शन देऊन पाणीपुरवठा पूर्ववत सुरू करण्याचीही मागणी करण्यात आली.

बुंदेलपुरा भागातील रस्ते मागील दहा ते बारा वर्षांपासून अतिशय खराब अवस्थेत असून त्यामुळे दररोज किरकोळ अपघात होत असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले. लहान मुलांसह अनेक नागरिकांना अपघातांना सामोरे जावे लागत असल्याने जीवितहानी होण्यापूर्वी प्रशासनाने तात्काळ उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी करण्यात आली.




ठराविक कालावधीत समस्यांचे निराकरण न झाल्यास शिवसेना शैलीने आंदोलन छेडण्याचा इशाराही आतिश अहिर यांनी दिला.निवेदन देताना दीपचंद किराय, सुनील चित्ते, चंदन अहिर, बजरंग चरपटे, अतिश चरपटे, निलेश आसोलकर, राम मासोतकर, प्रवीण परिवाले यांच्यासह शिवसैनिक व स्थानिक नागरिक उपस्थित होते.

# अवैध वाळू साठ्यावर महसूल विभागाची धडक कारवाई

## हिरूळ-पूर्णा नदीपात्रातून 10 ब्रास वाळू जप्त

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार, ( दि. 31 )** - तालुक्यातील हिरूळ-पूर्णा नदीपात्रात महसूल विभागाच्या नियमित गस्तीदरम्यान 10 ब्रास अवैध वाळू साठा जप्त करण्यात आला. शासनाची परवानगी न घेता वाळू उपसा व साठवणूक केल्याप्रकरणी ही कारवाई करण्यात आली आहे.

अवैध वाळू उपशावर आळा घालण्यासाठी महसूल विभागाने गस्त अधिक तीव्र केली असून, त्याच अनुषंगाने ही धडक कारवाई करण्यात आली. जप्त केलेली वाळू हिरूळ-पूर्णा येथील घरकुल योजनेतील लाभार्थ्यांना मोफत वाटप करण्यात आली.

ही कारवाई प्रभारी नायब तहसीलदार मनोज सोनारकर यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. यामध्ये महसूल सहायक सुमेध सोनोने, मंडळ अधिकारी भरत पर्वतकर तसेच वाहन चालक दिनेश राठोड सहभागी होते.




दरम्यान, अवैध वाळू उपशात सहभागी असणाऱ्यांविरोधात कायदेशीर कारवाई करण्यात येणार असून, भविष्यात अशा बेकायदेशीर प्रकारांवर शून्य सहनशीलतेची भूमिका घेतली जाईल, असा इशारा महसूल प्रशासनाने दिला आहे.

# राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांचा दौरा

**अमरावती-** गृह (ग्रामीण), गृहनिर्माण, शालेय शिक्षण, सहकार व खनिकर्म राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर रविवार, दि. 1 फेब्रुवारी रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. दौऱ्यानुसार डॉ. भोयर हे रात्री 8 वाजता तिवसा येथील श्री. देवरावदादा हायस्कूल प्रांगणात आयोजित आमदार चषक 2026 या अखिल भारतीय पुरुष व महिला कबड्डी स्पर्धेच्या बक्षीस वितरण सोहळ्याला उपस्थित राहतील. त्यानंतर सोयीने नागपूरकडे प्रयाण करतील.

# प्रजासत्ताक दिनानिमित्त रुग्णालयात फळवाटप




**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,( दि.31 )-** एक्स पॅरामिल्ट्री सर्व्हिसमॅन बहुउद्देशीय संस्था, वरुड यांच्या वतीने प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. देशसेवेत कार्य करून निवृत्त झालेल्या सैनिक व त्यांच्या कुटुंबीयांच्या कल्याणासाठी स्थापन झालेल्या या संस्थेमध्ये बीएसएफ, सीआरपीएफ, सीआयएसएफ, आयटीबीपी, आसाम रायफल्स, एसएसबी आदी दलांतील वरुड तालुक्यातील सुमारे 50 सेवानिवृत्त जवान सहभागी आहेत.

प्रजासत्ताक दिनानिमित्त महात्मा फुले चौकात छत्रपती शिवाजी महाराज व महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्यांचे पूजन व ध्वजारोहन करण्यात आले. त्यानंतर स्थानिक ग्रामीण रुग्णालयात उपचार घेत असलेल्या गरजू रुग्ण व महिलांना बिस्किटे व फळांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव तसेच वरुड शहर व तालुक्यातील सेवानिवृत्त सैनिक व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ढगाळ हवामानाचा फटका

## कांदा, गहू, लसूण, चारा पिके रोगांच्या विळख्यात

## उत्पन्न घटण्याची भीती, बळिराजा चिंतेत



**महासागर प्रतिनिधी**

**नांदगाव खंडेश्वर,( दि.31 )-** नांदगाव खंडेश्वर तालुक्यात मागील वर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे खरीप हंगाम वाया गेला होता. त्यानंतर रब्बी हंगामाकडून शेतकऱ्यांना मोठ्या अपेक्षा होत्या. मात्र गेल्या दोन दिवसांपासून निर्माण झालेल्या ढगाळ हवामानामुळे रब्बी पिकांवर विविध रोगांचा प्रादुर्भाव वाढला असून, शेतकरी वर्ग पुन्हा एकदा अडचणीत सापडला आहे.

अतिवृष्टीमुळे तालुक्यातील तलाव, बंधारे व नाले तुडुंब भरले असून, पाण्याची मुबलक उपलब्धता होती. या अनुकूल परिस्थितीत हजारो हेक्टरवर रब्बी पिके जोमात उभी राहिली होती. गावरान कांदा, गहू, हरभरा, लसूण तसेच चारा पिकांची मोठ्या प्रमाणात लागवड करण्यात आली होती. हरभरा व गव्हाच्या क्षेत्रात यंदा विशेष वाढ झाल्याचे चित्र होते.

मात्र मागील महिन्यात हवामानात अचानक बदल होऊन धुके व ढगाळ वातावरण वाढल्याने पिकांवर रोगांचा प्रादुर्भाव झाला. शेतकऱ्यांनी महागडी औषधे, फवारण्या व खतांचा वापर करून परिस्थिती आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. कसेबसे पिके सावरत असतानाच पुन्हा ढगाळ हवामानाने नवे संकट उभे ठाकले आहे. लाल कांद्याच्या हंगामात आधीच बाजारभाव गडगडलेले असताना, आता रोगांमुळे उत्पादनात घट होण्याची भीती व्यक्त होत आहे. उत्पादन खर्च वाढून हातात येणारे उत्पन्न घटण्याची शक्यता असल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. ढगाळ हवामानामुळे तालुक्यात शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे ढग दाटले असून, पुढील काही दिवस हवामान कसे राहते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

> ढगाळ हवामानामुळे पिकांवर विविध रोगांचा प्रादुर्भाव झाला आहे. शेतकऱ्यांनी पाण्याचे योग्य व्यवस्थापन, तसेच कृषितज्ज्ञांच्या सल्ल्याने उच्च दर्जाची कीटकनाशके, बुरशीनाशक औषधांची फवारणी करावी.
>
> **विकास पाटील**
> **तालुका कृषी अधिकारी, नांदगाव खंडेश्वर**

### पिकांवर पडलेले रोग!

गहू : मावा, तांबेरा, ज्वारी : चिकटा, मावा, हरभरा : घाटे अळी, मर , कांदा / लसूण : मावा, तुडतुडे, मर, करपा, डाऊनी, मका : अमेरिकन लष्करी अळी, भाजीपाला टोमॅटो अळी, डाऊनी, भेंडी नागअळी, लाल कोळी, तसेच अळीचा प्रादुर्भाव, कोथिंबीर भुरीचा प्रादुर्भाव, वांगे : अळीचा प्रादुर्भाव, मेथी मावा, कोबी/फ्लॉवर अळीचा प्रादुर्भाव

> सद्य:स्थितीत गावरान कांदा, गहू, हरभरा, चारा पिके जोमात होती. मागील महिन्यात धुके, दव अन् ढगाळ वातावरणामुळे मोठा खर्च करून पिके वाचवली. परंतु पुन्हा डगाळ वातावरणामुळे सर्वच पिकांना विविध रोगांनी ग्रासले आहे. निसर्गाच्या लहरीपणामुळे हातात उत्पन्न मिळेपर्यंत शाश्वती नाही.
>
> **मोरेश्वर दिवटे**
> **बागायतदार शेतकरी**


## जाहीर नोटीस

सर्व सामान्य लोकांना सूचित करण्यात येते की मी, माझे पक्षकार यांचे वतीने सदर जाहीर नोटीस देतो ती येणेप्रमाने,

मिळकतीचे वर्णन: मौजे बेगमपुरा, सर्वे क्रं. 7-B, प्लॉट क्रं. 2, ता. अचलपूर जिल्हा.अमरावती.

सदर मिळकत माझे पक्षकार नामे रवींद्र चक्रधर ढगे यांच्या मालकीची आहे. तदनंतर, रवींद्र चक्रधर ढगे यांनी Nido Home Finance Limited, येथे गृह कर्जासाठी अर्ज केला असता, सदर मिळकतीचे पूर्वीचे मूळ खरेदीखत दि. 23/07/2015 रोजीचे दस्त क्र. 2186 सदर मुळ खरेदी खत गहाळ झालेले आहे. तसेच सदर खरेदीखत कोणाला सापडल्यास किवा कुठे गहान/राष्ट्रीयकृत/खाजगी// पतसंस्था/सहकारी/इतर बँक बोजा, या मालमत्तेविषयी शासकीय-निमशासकीय काही भानगड, कोणाचा मालकी किवा वारस हक्क असल्यास, इतर कोणती हरकत असल्यास त्यांनी खाली दिलेल्या माझ्या मोबाईल क्रं. वर हि जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या 7 दिवसाच्या आत पुराव्यानिशी हरकत नोंदवावी. तदनंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही हि विनंती

कोर्ट शिक्का

आपला
**ADVOCATE**
**रवींद्र रू. वाटाणे**
**स्नेहगंधा कॉलनी, अमरावती**
**मो. नं. 9823698745**


RNINO-46975/1985 | Dainik Mahasagar Amravati | Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak; printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Hotel Tourist Beside Railway Station square, Amravati. Amravati head office, address: Dainik Mahasagar, Hotel Tourist beside Railway Station square, Amravati, phone no. 9518934504. Group Editor-in-Chief and Managing Director- Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७५/१९८५ | महासागर अमरावती | मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, हॉटेल टुरिस्टच्या बाजूला, रेल्वे स्टेशन चौक, अमरावती, येथे प्रकाशित केले. **मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक**




**वसंत म्हणजे चैतन्य, वसंत म्हणजे उल्हास आणि वसंत म्हणजे आशा... निसर्गभक्ती जागवणारं हे एक सर्जनपर्व आहे. रुक्ष, काष्ठवत झाडांवर कोवळी पालवी फुलू लागणं, लता-वेलींवर सुगंधी घोस लगडू लागणं, वातावरणात हवीहवीशी ऊब जाणवणं, सुगंधी लाटा आदळू लागणं हे वातावरण बदलाचे संकेत आहेत. ते आपल्याला साद घालत असतात. दोन क्षण थांबवू पहात असतात. त्यांची आर्जवं ऐकायलाच हवीत. त्यांना प्रतिसाद द्यायलाच हवा.**

# ऋतू वसंत आला...

भक्ती लेख

वसंत... या नावातच चैतन्याचा वास जाणवतो. थंडीच्या गारठलेल्या पर्वानंतर वसंत अवतरतो आणि मरगळलेल्या चराचराला जणू नवऊर्जा मिळते. काहीशा ऊबदार झुळुकीसरशी उन्हाळ्याचे पदरव जाणवू लागतात आणि वसंतागमनाचे वेध लागतात. वसंत म्हणजे सर्जनाचा आविष्कार. वसंत म्हणजे नवनर्मितीची नव्हाळी, वसंत म्हणजे कोवळी पालवी. म्हणूनच वसंताचं आगमन एक आगळीच प्रफुल्लता देऊन जातं. आताही असा हसरा वसंत अवतरला आहे. गावातच नाही तर शहरातही हा ऋतूबदल जाणवतोय. वसंत ऋतूची पावलं वाजू लागत आहेत हे या सतत धुळीनं माखलेल्या झाडांवरूनच ओळखता येतं. अचानक एखाद्या झाडाला पिवळ्या पिवळ्या फुलांचे उच्च लोंबू लागतात. फुलांच्या नाजूक पाकळ्या पथावर गळून पडतात आणि त्या पिवळ्या फुलांचा गालीचा पसरत राहतो. या रस्त्यावरुन जाताना फुलांच्या पायघड्यांवरुन जात असल्याचा भास झाल्याशिवाय रहात नाही. या दिवसात उष्ण वारं अंगावर येतं पण येताना बरोबर एक सूक्ष्म सुगंध आणतं. कुठून आला हा सुगंध, असं म्हणत शेजारी पहावं तर कोपऱ्यावरचा भव्य शिरीष वृक्ष नाजूक गुलाबी फुलांनी बहरलेला दिसतो आणि समजतं की गंधाचं मूळ इथे आहे! असे एक ना अनेक सुगंधी वृक्ष-लता या दिवसांमध्ये ठिकठिकाणी फुललेले असतात. कुठे मोगरा पानोपानी फुलत असतो, कुठे चमेलीला बहर आलेला असतो तर कुठे पांगारा फुलू लागलेला असतो. अजूनही कुंदाचा बहर कमी झालेला नसतो. आंब्याच्या मोहोराचा घमघमाट तर किती तरी दूरवरुन सुखावू लागतो. अशा सुगंधाच्या लाटा येत राहतात आणि तनामनाला प्रफुल्लित करत राहतात.

याच ऋतुत पांगाऱ्याच्या झाडावर लाल कळ्या दिसू लागतात. काही कळ्या अर्धवट उमललेल्या दिसतात. गंमत म्हणजे एखादा पक्षी त्या फुलात चोच खुपसून मध चाखताना दिसतो. लाल फुलांच्या जवळ बसलेला एखादा काळा कुळकुळीत कावळा हे दृष्यही किती मजेदार आहे! कावळा उकिरड्यावरचं उष्टं खरकटं वेचताना दिसतो हे आपल्याला परिचित दृष्य आहे पण तोच कावळा फुलातला मध किती हळूवारपणे टिपून घेतो हे कुणी पाहिलंय का? पण त्याच्याकडे लक्ष द्यायला वेळ कोणाकडे आहे? माणसं सकाळपासून बस, वा टॅक्सी पकडताना दिसतात. जनतेचा लोंढा रेल्वेगाडीकडे झुंबड करून चाललेला दिसतो. अशा वेळी निसर्गाचं, सृजनाचं आणि पाना-फुलाचं वेड एखाद्याला गुंडाळूनही ठेवावं लागतं. ज्यांच्यापाशी गाड्या आहेत ती माणसं सतत इतरांना 'ओव्हरटेक' करत, भरधाव वेगानं धावताना दिसतात. घाई, गर्दी, गडबड, गजबज, गोंगाट, धावपळ म्हणजे



सध्याची ही मोठी शहरं. पुढे जाण्यापलीकडे इथे कुणालाच वेळ दिसत नाही. अशा वेळी रस्त्याच्या कडेला फुलाफुलातून डोकावणारा वसंत ऋतू बघावा, त्याची भेट घ्यावी, त्याच्यातलं सौंदर्य न्याहाळून पहावं, आतून प्रसन्न व्हावं किंवा कधी कधी आतून पुलकित व्हावं असं कोणालाच वाटत नाही. कारण प्रत्येकाला आपल्या जबाबदारीची तीव्र जाणीव असते आणि उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी त्यांना सतत पळायचं असतं. अशा वेळी 'वासंतिक समय पातला' असं हळुवारपणे गुणगुणावंसं कोणालाच वाटत नाही.

अर्थार्जन हे आजच्या जीवनाचं प्रमुख उद्दिष्ट बनलं आहे. पैसा मिळवण्यासाठी मणसाची धडपड चालली आहे. त्याला सतत महागाईला तोंड द्यावं लागत आहे. अर्थार्जनासाठी सतत मानसिक आणि शारीरिक ताण सहन करावा लागत आहे. जगण्यासाठी सतत चाललेली ही धडपड वाढतच आहे. त्याला वेळ कुठे आहे बदलत्या ऋतूंकडे लक्ष द्यायला? सध्या निसर्गात काय घडामोडी घडत आहेत? हे त्याच्या खिसगणतीतही नाही. वसंत ऋतू येतो आणि जातो. तसाच वर्षा ऋतू येतो आणि मग शिशिर. गर्दीने गजबजलेल्या रस्त्याच्या कडेला पावसाळ्यात घनदाट हिरवी पालवी भेटते. थंडीत त्याच झाडांची पालवी सुकून पिवळी पडते आणि सुकलेल्या पानांचा दिवसभर वर्षाव होतो. फुटपाथवरचा पाचोळा पडत राहतो. हे सगळं घडत असतं पण आपण मात्र झापडं लावून जगत राहतो.


निसर्ग सतत बदलत राहतो. आपलं नवतळी रूप दाखवत राहतो. कधी पाचोळा, कधी फुलं आणि आता फुलांचे, कळ्यांचे, गंधाचे दिवस आहेत. प्रदुषणमय शहरात कुठेकुठे झाडांनी फुलांचे बहर फेकले आहेत. आपण दुर्लक्ष केलं तरी सगळेच आपल्यासारखे नसतील. काहीजण असे असतीलच जे झाडांवरचा फुलोरा बघून वेडावून रस्त्यात थांबत असतील. हवेतला सुगंध हुंगत असतील. निसर्गातले सुंदर बदल पाहून आतून दरवळत असतील आणि मनातल्या मनात गुणगुणत असतील... 'वासंतिक समय पातला.' तर मग आपणही त्यांच्यातील एक होऊन जायला काय हरकत आहे. ही एक सकारात्मक निसर्गभक्तीच ठरावी. वेळ कोणासाठी थांबत नाही. तो त्याच्या वेगात पुढे जातच राहतो. मग आपणच क्षणिक थांबायला हवं. त्याचा आस्वाद घ्यायला हवा. त्याला खूप काही सांगायचं आहे. त्यांचं म्हणणं तर ऐकून घेऊ या!

# हनुमानाचं निवासस्थान

तीर्थक्षेत्र

हिंदू धर्मात सप्तचिरंजीवांचा उल्लेख आढळतो. हनुमानालाही रामाच्या आशीर्वादामुळे अमरत्त्वाचं वरदान लाभलंय. त्याच्या अस्तित्त्वाबद्दलच्या सुरस कथा आजही ऐकायला मिळतात. हनुमान आजही कैलास पर्वताच्या उत्तरेकडच्या विशिष्ट ठिकाणी हनुमान आजही वास करतो, असं म्हटलं जातं. विविध धर्मग्रंथ आणि पुराणांमध्येही हनुमानाच्या निवासस्थानाचं वर्णन सापडतं. हनुमान गंधमादन पर्वतावर निवास करतो, असं मानलं जातं. एका कथेनुसार, अज्ञातवासात असताना पांडव हिमवंत पार करून गंधमादन पर्वतावर दाखल झाले. याच पर्वतावर हनुमानाने भीमाचं गर्वहरण केलं. गंधमादन पर्वत कैलास पर्वताच्या उत्तरेकडे वसलाय. महर्षी कश्यप यांनी या पर्वतावर तपश्चर्या केली होती, असा उल्लेख आढळतो. या पर्वतावर गंधर्व, किन्नर, सिद्धमुनी, अप्सरांचा वासही असल्याचं बोललं जातं. या पर्वत शिखरावर पोहोचणं फार अवघड आहे. या ठिकाणी वाहन नेता येत नाही.

गंधमादन पर्वत आज तिबेटमध्ये आहे. वेदकाळात या पर्वतक्षेत्रावर कुबेराचं राज्य होतं. सुमेरू पर्वताच्या चारही दिशांना असलेल्या गजदंत पर्वतापैकी एक म्हणजे गंधमादन पर्वत. याच नावाचा एक पर्वत



दक्षिणेकडे रामेश्वरमजवळही वसलाय. या पर्वतावरूनच हनुमानाने लंकेच्या दिशेने उडी घेतली होती.

गंधमादन पर्वतावर मंदिर उभारण्यात आलंय. या मंदिरात हनुमानासोबतच राम, सीता यांच्या मूर्ती आहेत. याच पर्वतावरून भगवान राम रावणाविरोधात युद्धाची रणनीती आखत असत असं म्हटलं जातं. आजही या पर्वतावर रामाच्या पाउलखुणा आढळतात, असं भक्तमंडळी सांगतात.



# आरोग्यकारक टिळा

जाणून घ्या

हिंदू धर्मात कपाळावर टिळा लावण्याला मोठं महत्त्व आहे. शीर, मस्तक, गळा, हृदय, दोन्ही दंड, नाभी, पाठ, काखा अशा शरीरावर एकूण बारा ठिकाणी टिळा लावण्याची प्रथा आहे. टिळा लावणं लाभदायी मानलं जातं. प्रत्येक वारानुसार टिळा लावल्याने बरेच लाभ होऊ शकतात. टिळा लावण्याच्या प्रथेबद्दलची ही सविस्तर माहिती...

कपाळाच्या मध्यभागाला ललाटबिंदू असं म्हटलं जातं. भुवयांच्या मधोमध हा ललाटबिंदू असतो. शेंदूर किंवा कुंकुम उष्ण मानलं असल्याने या स्थानी टिळा लावणं आरोग्यकारक मानलं जातं. पूजा करताना देवाला कुंकू किंवा टिळा लावणं महत्त्वाचं आहे. देवाला आंघोळ घातल्यानंतर चंदनाला टिळा लावावा. पूजा करणाऱ्यानेही मस्तकावर चंदनाचा टिळा लावला पाहिजे. यामुळे मन आणि शरीर शांत होतं. टिळा लावण्याआधी काही नियमांचं पालन करणं गरजेचं आहे. स्नान करून, रेशमी वस्त्र धारण करून उत्तर दिशेला तोंड करून मगच टिळा लावला पाहिजे. चंदनाचा टिळा शितलता देतो. अनेकदा आपण रागाच्या भरात किंवा घाईघाईत कामं उरकतो, निर्णय घेतो. उत्साहाच्या भरात आपले निर्णय चुकतात पण चंदनाचा टिळा लावल्याने उत्तेजना नियंत्रणात राहते.

कोणत्या कार्यप्रसंगी कोणत्या बोटाने टिळा लावायला हवा याचा उल्लेख विष्णू संहितेत आढळतो. शुभ आणि वैदिक कार्य करताना अनामिकेचा वापर केला पाहिजे. श्राद्धकर्म आणि पितरांशी संबंधित कार्य करताना मधलं बोट, ऋषीकार्यात करंगळी तर तांत्रिक कार्यात पहिल्या बोटाचा वापर करून टिळा लावायला हवा. यामुळे योग्य तो परिणाम साधला जातो. अनामिकेने लावलेल्या टिळ्यामुळे शांततेचा लाभ होतो. मधल्या बोटाने टिळा लावल्यावर दीर्घायुष्याचा लाभ होतो. यासोबतच अंगठ्याने टिळा लावल्याने बळ, शारीरिक क्षमता वाढते, असं मानलं जातं.

कुमकुम, केशर, चंदन आणि भस्म अशा चार प्रकारांनी टिळा लावता येतो. कुंकवामुळे आपल्या आज्ञाचक्राची शुद्धी होते तसंच ज्ञानचक्र प्रज्वलित होतं. शांत, थंड मेंदूला केशराच्या टिळ्याने उर्जीतावस्था प्राप्त होऊ शकते. चंदनामुळे मेंदू आणि मनाला शांतता लाभते. भस्मामुळे मनात वैराग्यभावना जागृत होते. भस्मामुळे विषाणूंचा नायनाट होतो. टिळा लावल्याशिवाय संध्या केली तर योग्य तो परिणाम साधला जात नाही. चंदनाच्या टिळ्यामुळे पापांचा नाश होतो. संकटं दूर राहतात. अशा व्यक्तीवर लक्ष्मीची कृपा राहते. प्रत्येक वारानुसार टिळा लावल्याने आपल्यावर ग्रहांची कृपा राहते. सोमवार हा शंकराचा वार मानला जातो. या दिवसाचा स्वामी म्हणजे चंद्र. चंद्र मनाचा कारक मानला जातो. मनाला नियंत्रणात ठेऊन मेंदूला शांत ठेवण्यासाठी या दिवशी चंदनाचा टिळा लावा. विभूती किंवा भस्मही लावता येईल. मंगळवार हा मंगळाचा वार आहे. या दिवशी हनुमान आणि गणपतीची पूजा केली जाते. मंगळ लाल रंगाचं प्रतिनिधित्त्व करतो. त्यामुळे रक्तचंदन किंवा चमेलीचं तेल मिसळलेलं कुंकू या दिवशी लावता येईल. बुधवारी कोरडं कुंकू लावता येईल. गुरूला पांढरा आणि पिवळट रंग आवडतो. त्यामुळे गुरूवारी पांढरं चंदन उगाळून त्यात केशर मिसळून मस्तकावर टिळा धारण करावा. शुक्रवारी रक्तचंदनाचा टिळा लावल्याने ताण दूर होतो. तसंच भौतिक सुख-सुविधांची प्राप्ती होते. शनिवारी विभूती, भस्म किंवा रक्तचंदन लावलं पाहिजे. रविवारी रक्तचंदन किंवा हिरवं चंदन लावावं. यामुळे आपल्यावर भगवान विष्णूची कृपा राहते.


# सामना समस्यांचा

सेल्फ हेल्प

दैनंदिन आयुष्यात अनेक समस्या येतात. या समस्यांचा सामना करतच आपल्याला आयुष्यची प्रत्येक शिडी चढायची असते. समस्यांना घाबरून जाऊ नये. दुःख, समस्या जीवनाचा एक भाग आहे. त्या येतच राहणार. खरी गरज आहे ती या समस्यांचा सामना करून पुढे जाण्याची. दैनंदिन आयुष्यात येणाऱ्या अनेक समस्यांवर आपण मात करू शकतो. यासाठी आपण लोहचुंबकाचं उदाहरण घेऊ. लोहचुंबकात दोन गोष्टी असतात. एक असतं लोखंड तर दुसरं असतं चुंबकाच्या आसपासचं आकर्षण. हे आकर्षण, शक्ती दिसत नाही पण लोहाला ती स्वतःकडे आकर्षित करून घेत असते. आता आयुष्यातल्या समस्यांना याच्याशी जोडून बघा. आयुष्यात संकटं येतच राहणार. एक समस्या संपली की दुसरी हजर असणार. आनंद, दुःख फार काळ टिकून रहात नाही. आनंदानंतर दुःख येतं तसं दुःखानंतर सुख येतंच. आयुष्यात संकट किंवा दुःख आलं की आपल्यासोबत नेमकं काय होतं हे आधी जाणून घेऊ. एक म्हणजे आपण वैतागतो, घाबरतो आणि एकटेपणाची जाणीव आपल्या मनात घर करून राहते. अशा वेळी आपण इतरांचा आधार शोधू लागतो.



समस्यांनंतरच्या या तिन्ही स्थिती आपल्यासाठी चांगल्या नसतात. या स्थितींमध्ये आपण पूर्णपणे अडकून पडतो. या चक्रात गोलगोल फिरू लागतो. समस्यांचा सामना करताना आपल्याला नैराश्य येतं. या नैराश्याच्या गर्तेत आपण खोल खोल रूतत जातो. इतके खोल रूततो की अनेकदा आत्मघाती निर्णय घेऊन मोकळे होतो. हे चुकीचं आहे. समस्येचा परिणाम आपल्यावर होऊ द्यायचा नसेल तर सर्वात आधी समस्येला दूर करण्याचा प्रयत्न करा. समस्येला दूर सारणं म्हणजे विसरणं नव्हे पण काही काळासाठी समस्येला विसरून जा. आपल्यावर काही संकट कोसळलंय असा विचार मनात येऊ देऊ नका. आपण रस्त्याने चालत असतो. त्यावेळी इतरांना वाट करून देतो पण म्हणून आपण चालायचं थांबत नाही. त्याचप्रमाणे समस्या सोडवण्यासाठी ती विसरणं गरजेचं आहे. संकट आलं असेल तर इतरांना मदत करा, दुसऱ्या कामात मन गुंतवा. यामुळे आपल्या आतली ऊर्जा इतरांच्या दिशेने वाहू लागते आणि स्वतःवरचं लक्ष विचलित होतं. यामुळे आपल्या समस्येचा विसर पडेल. इतरांची मदत करत असल्याचं समाधान आपल्याला मिळू शकेल. इतरांना मदत केल्याने त्यांच्या दृष्टीने आपलं महत्त्व वाढेल. लोक आपली किंमत करू लागतील. यामुळे स्वतःचं महत्त्व पटू लागेल. आपलं स्वतःचं मूल्य आपण जाणून घेऊ. याचाच अर्थ आपलं मनोबल, मानसिक क्षमता वाढेल. त्यामुळे समस्येचा सामना करताना हे उपाय नक्की आजमवा. तुम्हाला मानसिक शांतता लाभेल आणि समस्येवरचे उपाय शोधता येतील.



# मौनाची शक्ती

बोध

अध्यात्मिक उंची गाठण्यासाठी मौनव्रत धारण केलं जातं. मौन माणसाचा चांगला मित्र आहे. मौनाच्या जोरावर भगवान बुद्ध आणि महावीराने आत्मज्ञानाची प्राप्ती केली होती. मौनात एक अनोखी शक्ती असते. महर्षी रमण आणि चाणक्यालाही मौनाचं महत्त्व माहित होतं. मौन बाळगल्यावर मनात चांगले विचार येतात. मौनातूनच जगाची निर्मिती होते. शरीर तंदुरूस्त राखण्यासाठी, रोगांना दूर ठेवण्यासाठी आपण चांगलंचुंगलं खातो. पोषक आहार घेतो. तसंच मनाच्या आरोग्यासाठी मौन अतिशय महत्त्वाचं आहे. मौन ही जीवनाची परिभाषा आहे. मौनात हजारो शब्दांची ताकद असते. मौन आपल्याला बरंच काही देतं, बरंच काही शिकवतं. मौनाचं महत्त्व जाणणारे लोक कधीही अयशस्वी होत नाहीत. मौनामुळे आपण शांत राहतो. मौनामुळे स्वतःवर संयम आणि नियंत्रण ठेवणं शक्य होतं. साधनेच्या प्रत्येक मार्गात मौनाचं महत्त्व अधोरेखित करण्यात आलं आहे. मौनाशिवाय आपण अपूर्ण आहोत. स्मरणशक्ती, एकाग्रता वाढवण्यासाठी समुपदेशक मौनावर भर देण्याचा सल्ला देतात. मौनामुळे मनावर आणि परिणामी स्वतःवर ताबा ठेवणं शक्य होतं. स्वतःसोबत काही वेळ घालवल्याने आपण बरंच काही जाणू शकतो. इतरांसोबत वेळ घालवताना स्वतःला विसरून चालत नाही. आपल्या आतला आवाज जाणून घेण्यासाठी, या पृथ्वीतलावर जन्म घेण्याचं उद्दीष्ट जाणण्यासाठी आपल्याला मौनाची मदत होते. मौनामुळे मनाची शक्ती वाढते. शरीराची शक्ती वाढते. मनाची क्षमता वाढली की क्रोध, चिंता, ताण, भीती यांना स्थान रहात नाही.

मौनाचं महत्त्व विज्ञानालाही पटलंय. शांत आणि मौनात राहिल्याने संवेदनशीलता, विचार आणि भावनांमध्ये सकारात्मक परिवर्तन होतं. अनेक चमत्कारिक परिणाम आपल्याला मिळू शकतात. मौनामुळे आपण स्वतःला ओळखू लागतो. आपल्यात सकारात्मक बदल घडू लागतात. मौनामुळे आपण जागरूक राहतो. मौनामुळे भावनांवर नियंत्रण राहतं. कोणत्याही गोष्टीचा आपल्यावर परिणाम होत नाही. आपला मेंदू सर्वात शक्तीशाली असतो. व्यायामामुळे शरीराला लाभ होतात तसंच मौन हा मेंदूचा खुराक आणि व्यायाम आहे. वादविवाद होत असतील तर शांत राहणं सर्वाधिक गरजेचं असतं. निरर्थक बाबींवर चर्चा करत राहणं, आवाज चढवून बोलणं, कारण नसताना चर्चेत सहभागी होणं, वाद वाढवणं यामुळे आपला ताण वाढतो. प्रसंगी शांत राहणं गरजेचं असतं हे मौनातून शिकता येतं. वादविवादांमुळे मानसिक संतुलन बिघडतं, मनस्वास्थ्य हरवतं. हे सगळं टाळायचं असेल तर मौनाचे प्रयोग केले पाहिजे.

# जीवनात वेग हवाय?

वास्तू भक्ती

आयुष्यात प्रत्येकाला यश आणि प्रसिद्धी हवी असते. या गोष्टी मिळवण्यासाठी गरज असते ती प्रयत्न, मेहनत आणि आत्मविश्वासाची. या तीन बाबींच्या जोरावर आयुष्यात काहीही मिळवता येतं. प्रतत्नांती परमेश्वर असं म्हटलं जातं. पण प्रयत्न करूनही अनेकांना अपयशाचा सामना करावा लागतो. प्रयत्न यशस्वी होण्यासाठी आपल्याला योग्य दिशा मिळावी लागते तसंच सकारात्मक वातावरणाचीही गरज असते. फेंगशुई शास्त्रात वापरल्या जाणाऱ्या काही वस्तू आणि उपायांच्या मदतीने तुमच्या प्रयत्नांना योग्य दिशा मिळू शकते. गॅझेट घोड्याच्या वापरामुळे तुमच्या प्रयत्नांना वेग येऊ शकतो. याविषयीची माहिती जाणून घेऊया...



* गॅझेट घोड्याची मूर्ती किंवा फोटो घरात ठेवता येईल. मूर्ती किंवा फोटोचा सारखाच प्रभाव पाडतो. गॅझेट घोडा योग्य दिशेला ठेवणं महत्त्वाचं मानलं जातं.

* दक्षिण आणि उत्तर या यशाच्या दिशा मानल्या जातात. घोडा दक्षिण दिशेला ठेवता येईल. तसंच करीअरची दिशा मानल्या जाणाऱ्या उत्तरेकडेही हा घोडा ठेवता येईल.

* घरात गॅझेट घोड्याचा फोटो लावता येईल. तर ऑफिसमध्ये घोड्याची मूर्ती ठेवणं अधिक लाभदायी ठरू शकतं.

* फेंगशुई शास्त्रानुसार घोडा आगीचं प्रतिनिधित्त्व करतो. त्यामुळे घोड्याला लगाम असू नये. घोडा कायम उधळलेला असावा. वेग मंदावलेल्या घोड्याचा फोटो किंवा मूर्ती ठेऊ नये.

* घोड्यासाठी योग्य दिशा मिळत नसेल तर त्याचं तोंड खिडकी किंवा दरवाज्याच्या बाजूने करा.

* बेडरूममध्ये दोन घोडे ठेवा. घोड्याच्या जोडीचं चित्रं लावा. यामुळे पती-पत्नींमध्ये वाद होत नाहीत.

* फळं फुलं, हसरी मुलं यांचे फोटो आयुष्यात सकारात्मक ऊर्जा निर्माण करतात. असे फोटो पूर्व किंवा उत्तरेकडच्या भिंतींवर लावा.

* धनाची देवता असणाऱ्या कुबेर आणि लक्ष्मी यांचे फोटोही उत्तर दिशेला लावले पाहिजेत. यामुळे धनलाभाची शक्यता वाढते.

* निसर्गचित्रं दक्षिण किंवा पश्चिम दिशेला लावावीत.

* नद्या, झरे यांचे फोटो किंवा चित्रं उत्तर तसंच पूर्व दिशेला लावणं लाभदायी ठरतं.

* घराच्या उत्तर-पूर्व कोपरा स्वच्छ ठेवा. तसंच इथे वाहत्या पाण्याचं चित्रं लावा.

* युद्धप्रसंग, रामायण-महाभारतातले युद्धप्रसंग, वैराग्य, भीतीदायक फोटो, करूण स्त्री, सुकलेलं झाड अशी चित्रं घरात लाऊ नका. यामुळे नकारात्मक प्रभाव पडतो.



# रहस्य आनंदी जीवनाचं

धर्मग्रंथातून

प्रत्येकाला सुखी आणि आनंदी जीवन जगायचं असतं. यासाठी बरेच प्रयत्न केले जातात. अनेक युगांपूर्वी लिहिल्या गेलेल्या रामायण आणि महाभारतासारख्या ग्रंथांमध्ये सुखी आणि आनंदी जीवनाचं रहस्य दडलंय. श्रीकृष्णाने सांगितलेल्या या दहा गोष्टी अंगिकारल्या तर आपलं जीवन बऱ्याच अंशी सुसह्य होऊ शकतं.

* मनुष्य विश्वासाच्या जोरावर घडतो. तो जसा विचार करतो तसा घडतो.

* लोकांना तुमचं चांगलं बघवत नाही. तुमचा अपमान करण्यासाठी ते कायम प्रयत्नशील असतात. अपमानाबद्दल ते बोलतात पण मानी व्यक्तीसाठी अपमान मृत्यूपेक्षाही भयंकर असतो.

* प्रत्येक व्यक्ती आपल्या कुवतीनुसार विचार करत असते. त्यामुळे फळाच्या अपेक्षेने कर्म करणाऱ्या अज्ञानी व्यक्तीला ज्ञानी माणसाने चुकीचं ठरवू नये.

* आपल्या कामातून आनंद मिळवण्याची सवय लागली की पूर्णत्त्व प्राप्त होतं.

* जो कामात निष्क्रियता आणि निष्क्रियतेत काम शोधतो तो खऱ्या अर्थाने बुद्धीमान मानला जातो.

* कृष्णाने म्हटलंय, मला कोणतीही व्यक्ती प्रिय नाही आणि मी कुणाचाही राग करत नाही पण माझी भक्ती करणारा माझ्यासोबत आहे आणि मी त्याच्यासोबत आहे.

* लायकी नसलेल्या व्यक्तीसाठी आपण उगाचच शोक करत बसतो. दुःख करत बसतो. ज्ञानी माणसं जिवंत किंवा मृत व्यक्तीसाठी शोक करत बसत नाहीत.

* ज्या देवावर विश्वास असेल आणि त्याची पूजा मनापासून करण्याची इच्छा असेल त्या देवावरचा विश्वास मी दृढ करत असतो, असं कृष्ण सांगतो.

* सर्व इच्छांपासून मुक्त झालेल्या आणि अहंभाव, मीपणा सोडलेल्या व्यक्तीला शांती मिळते.

* कर्माच्या फळाची अपेक्षा न करणाऱ्या व्यक्तीला कर्म बांधून ठेऊ शकत नाही.

### नीता ठाकरे महापौर, संजय बालपांडे उपमहापौर, शिवानी दाणी स्थायी समिती सभापती

# नागपूर मनपाच्या सत्ता रचनेवर शिक्कामोर्तब

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३१ :

अनेक तर्क-वितर्कांना छेद देत भारतीय जनता पक्षाने नागपूर महानगरपालिकेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची नवी टीम जवळपास निश्चित केली आहे. अधिकृत घोषणा येत्या २ फेब्रुवारी रोजी होणार असली, तरी सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार सत्तेची सूत्रे कुणाच्या हाती जाणार हे स्पष्ट झाले आहे.

दक्षिण नागपूरमधून निवडून आलेल्या सौ. नीता ठाकरे या नागपूरच्या पुढील महापौर असतील, तर मध्य नागपूरचे नगरसेवक ॲड. संजय बालपांडे यांची उपमहापौरपदी निवड होण्याची शक्यता आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दक्षिण-पश्चिम नागपूर विधानसभा क्षेत्रातील तरुण नगरसेविका शिवानी दाणी यांच्याकडे महापालिकेच्या तिजोरीची चावी देत त्यांची स्थायी समिती सभापती म्हणून निवड केली जाणार असल्याची माहिती आहे.


सौ. नीता ठाकरे


ॲड. संजय बालपांडे


शिवानी दाणी


नरेंद्र बोरकर

दरम्यान, सर्वाधिक २५ नगरसेवक निवडून आणणाऱ्या पूर्व नागपूर मतदारसंघातील ज्येष्ठ नगरसेवक नरेंद्र उर्फ बाल्या बोरकर यांची सत्तापक्ष नेता म्हणून निवड निश्चित मानली जात आहे. अंतिम क्षणी काही नावांमध्ये बदल होण्याची शक्यता सूत्रांनी व्यक्त केली आहे.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे तसेच सर्व भाजप आमदारांच्या उपस्थितीत राजवाडा पॅलेसमध्ये झालेल्या नवनिर्वाचित नगरसेवकांच्या बैठकीत या नावांवर शिक्कामोर्तब झाले. महापौरपदासाठी सुरुवातीला शिवानी दाणी यांचे नाव चर्चेत असले तरी अखेर अनुभवी नीता ठाकरे यांच्यावर पक्ष नेतृत्वाने विश्वास टाकला.

यंदा महत्त्वाच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडीत उत्तर नागपूरला डावलण्यात आल्याचे चित्र आहे. या भागातील नगरसेवकांना परिवहन, आरोग्य यांसारख्या समित्यांच्या सभापतीपदावर समाधान मानावे लागण्याची शक्यता आहे.

**पाच वर्षांत चार महिला महापौर?**

बैठकीत ठरलेल्या नियोजनानुसार महापौर व उपमहापौरांचा कार्यकाळ सव्वा-सव्वा वर्षांचा असेल. त्यामुळे पाच वर्षांत नागपूरला चार महिला महापौर व चार उपमहापौर मिळणार आहेत. तर स्थायी समिती सभापती आणि सत्तापक्ष नेत्यांचा कार्यकाळ प्रत्येकी एक वर्षाचा राहणार आहे. उपमहापौरपदासाठी ॲड. संजय बालपांडे यांचे नाव पुढे आले असले, तरी ते हे पद स्वीकारतील की नाही याबाबत साशंकता आहे. मात्र वरिष्ठ नेत्यांच्या निर्णयानुसार मिळालेले पद स्वीकारणे अपरिहार्य ठरणार असल्याचे पक्षातील जाणकारांचे म्हणणे आहे.

## कोट्यवधींच्या चोरी प्रकरणात दोन आरोपींना अटक

### ३ कोटी ३३ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त

■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. ३१ :

नागपूरच्या सदर परिसरात पेट्रोलपंप चालकाच्या बंगल्यात झालेल्या चोरीप्रकरणी पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली आहे. या घटनेनंतर तेरा दिवसांनी गुन्हे शाखेने ही कारवाई केली असून, आरोपींकडून ३ कोटी ३३ लाख ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अटक केलेल्या आरोपींना न्यायालयात हजर करण्यात आले. रजनीकांत चानोरे आणि प्रताप उरकुडे अशी पोलिसांनी अटक केलेल्या दोन चोरांची नावे आहेत. हे दोघेही भंडारा जिल्ह्यातील रहिवासी आहेत.

या प्रकरणातील मुख्य आरोपीने चोरी केलेले पैसे आपल्या प्रेयसीवर खर्च करण्याची योजना आखली होती, अशी माहिती समोर आली आहे. त्याची प्रेयसी हैदराबाद येथे एमबीबीएसचे शिक्षण घेत असून, आरोपीला तिला भारतातील विविध पर्यटनस्थळी फिरवण्यासाठी आणि महागड्या भेटवस्तू देण्यासाठी पैशांची गरज होती.



शिर्के लेआउट येथील रहिवासी बलजिंदर सिंग इंद्रजित सिंग नय्यर (५६) आणि त्यांचे बंधू शहरात पेट्रोल पंप व इतर व्यवसाय चालवतात. १९ जानेवारी रोजी सायंकाळी बलजिंदर सिंग यांच्या धाकट्या मुलाचा कळमेश्वर येथील फार्महाऊसवर साखरपुडा होता. त्यामुळे कुटुंबातील सर्व सदस्य फार्महाऊसवर गेले होते आणि घरात कोणीही नव्हते. मध्यरात्रीच्या सुमारास चोरट्याने घराच्या मागील बाजूस असलेल्या स्वयंपाकघरातील खिडकीचे ग्रील तोडून घरात प्रवेश केला.

चोरट्याने बलजिंदर यांच्या आईच्या खोलीतील कपाटाचे कुलूप तोडून २४७ ग्रॅम सोन्याचे दागिने, १ कोटी रुपये किमतीचे हिऱ्यांचे दागिने आणि त्यांच्या भावाच्या खोलीतून ६५ लाख रुपये रोख रक्कम लंपास केली. एकूण ३ कोटी ९१ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल चोरीला गेला होता. ही रोख रक्कम तीन दिवसांच्या पेट्रोल विक्रीतून जमा झाली होती.

२० जानेवारी रोजी सकाळी नय्यर कुटुंब घरी परतल्यावर त्यांना कपाटांची कुलुपे तुटलेली आणि मौल्यवान वस्तू गायब झाल्याचे दिसले. त्यांनी तात्काळ पोलिसांना माहिती दिली. त्यानंतर वरिष्ठ पोलिस अधिकारी, श्वान पथक आणि ठसे तज्ज्ञ घटनास्थळी दाखल झाले.

२० जानेवारी रोजी सदर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. चोरट्याने घरात प्रवेश करण्यापूर्वी सीसीटीव्ही कॅमेरे झाकण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, एका अन्य कॅमेऱ्यात आरोपी चोरी करताना कैद झाला होता, ज्यामुळे पोलिसांना तपासात मदत झाली. पोलिसांना घाम फोडणाऱ्या या दोन हायटेक चोरांना गुन्हे शाखेने ठाणे येथून अटक केली.

## तटकरे-पटेलांच्या 'खेळी'वर दानवेंचा प्रहार

■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ३१ :

महाराष्ट्र अद्याप अजितदादांच्या निधनाच्या धक्क्यातून सावरलेला नाही, तोच राजकारणात 'पॉवर गेम'ला हिणकस वळण लागले आहे.

सुनेत्रा पवार यांच्या संभाव्य शपथविधीवरून शिवसेना (ठाकरे गट) नेते अंबादास दानवे यांनी सत्ताधारी राष्ट्रवादीच्या वरिष्ठ नेतृत्वावर तोफ डागली आहे.

सुनील तटकरे आणि प्रफुल्ल पटेल हे नेते स्वतःच्या स्वार्थासाठी कोणत्याही थराला जाऊ शकतात, असे खळबळजनक विधान करत दानवे यांनी राजकीय वर्तुळात खळबळ उडवून दिली आहे.



अजितदादांच्या एक्झिटला अवघे चार दिवस झाले असतानाच सत्तेची पदे वाटली जात असल्याबद्दल दानवे यांनी तीव्र संताप व्यक्त केला. कुटुंबात आणि राज्यात अजूनही दुखवटा आहे, अशा वेळी खुर्चीसाठी होणारी ही धावपळ संतापजनक आहे, अशा शब्दांत त्यांनी आपला संताप व्यक्त केला.

तटकरे आणि पटेल यांनी केवळ आपली मंत्रिपदे आणि पक्षावरील ताबा सुरक्षित करण्यासाठी सुनेत्रा वहिनींना 'ढाल' म्हणून वापरल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

शरद पवारांनी आज सकाळी केलेल्या गौप्यस्फोटाचा आधार घेत दानवे यांनी सत्ताधाऱ्यांची कोंडी केली.

जर १२ तारखेला दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार होत्या, तर मग आताच वेगळ्या शपथविधीची ही घाई कशासाठी? यावर भाष्य करताना दानवे म्हणाले, तटकरे आणि पटेलांना एक अनामिक भीती सतावत आहे. जर शरद पवार पुन्हा सक्रिय झाले, तर त्यांचे राजकीय अस्तित्व धोक्यात येईल. याच भीतीपोटी त्यांनी अजितदादांच्या इच्छेविरुद्ध जाऊन सत्तेचा हा नवा डाव मांडला आहे.

**राजकीय नैतिकतेचा अंत?**

अजितदादांच्या निष्ठावान कार्यकर्त्यांच्या भावना अद्याप अनावर आहेत, तरीही मुंबईत मंत्रिपदाच्या आणि शपथविधीच्या चर्चा रंगत आहेत. या नेत्यांना ना नात्यांचे सोयरसुतक उरले आहे, ना निधनाचे गांभीर्य, असे म्हणत दानवे यांनी थेट राजकीय नैतिकतेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

## वाघाच्या हल्ल्यात शेतकऱ्याचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. ३१ :

तालुक्यातील ताडोबा जंगल लगतच्या चोरगाव मधील उद्धव वारलू मोहुर्ले (६५) यांचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झाला. वरवट चोरगाव मार्गावरील शेतीच्या कामासाठी स्वतःच्या शेतात गेले असताना त्यांच्यावर वाघाने हल्ला केला व जंगलात फरफटत नेले. रात्रभर शोध घेतल्यानंतर तपास लागला नाही.



शनिवार ३१ जानेवारी रोजी सकाळी ७.३० वाजताच्या सुमारास वन विभागाच्या स्थानिक कर्मचाऱ्यांनी शोध घेतल्यानंतर ५८५ कंपार्टमेंट मध्ये मृतदेह आढळला. मृतदेह शवविच्छेदनसाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात पाठविण्यात आला आहे.

## राख अजून शांत झालेली नाही तरीही...

### संजय राऊत यांच्या वक्तव्याशी संजय गायकवाडांची सहमती

■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. ३१ :

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या भीषण विमान अपघातात झालेल्या अकाली निधनानंतर महाराष्ट्राच्या राजकारणात मोठ्या आणि वेगवान घडामोडी घडल्या.



अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार या राज्याच्या उपमुख्यमंत्रिपदी शपथ घेणार आहेत. सुनेत्रा पवार या महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री ठरल्या. दुःखद घटनेनंतर इतक्या लवकर सत्ता बदलाचा निर्णय झाल्याने राजकीय वतुर्ळात विविध प्रतिक्रिया उमटत आहेत.

या शपथविधीवर प्रतिक्रिया देताना शिवसेनेचे बुलढाण्याचे आमदार संजय गायकवाड यांनी सूचक आणि भावनिक भाष्य केले आहे. अजित दादांची राख अजून शांत झालेली नाही. इतक्या लवकर अशा घडामोडी होतील, असं वाटलं नव्हतं, असे ते म्हणाले. त्यांच्या या वक्तव्यामुळे शोक आणि राजकारण यातील ताण पुन्हा एकदा समोर आला आहे.

मात्र, त्यांनी हेही स्पष्ट केले की हा निर्णय पवार कुटुंबाचा एकत्रित आणि सामूहिक निर्णय असू शकतो. गेल्या काही दिवसांतील घडामोडी पाहता, अजित पवारांचीही मानसिकता दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येऊन निर्णय घेण्याचीच होती, असे गायकवाड यांनी सांगितले.

संजय गायकवाड पुढे म्हणाले की, या संपूर्ण प्रक्रियेमागे पवार कुटुंबाचा समन्वय दिसतो. दोन्ही कुटुंबांनी बसून हा निर्णय घेतला आहे. त्यांच्या पाठीशी भीष्मपितामह म्हणून शरद पवार उभे आहेत. त्याचवेळी अजित पवारांच्या निधनामागे कोणताही घातपात नसून हा केवळ आणि केवळ अपघात असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले. अपघाताबाबत संशय पसरवणाऱ्या चर्चांवर पूर्णविराम देण्याची गरज असल्याचे संकेत त्यांच्या वक्तव्यातून मिळाले.

दरम्यान, या विमान अपघाताची सखोल चौकशी झालीच पाहिजे, अशी भूमिका आमदार संजय गायकवाड यांनी घेतली आहे. सर्वजण चौकशीची मागणी करत आहेत आणि मीही तीच मागणी करतो, असे ते म्हणाले. अजित पवारांच्या चारित्र्यावर किंवा त्यांच्या प्रतिमेवर कलंक लागेल, अशा चर्चा आता थांबल्या पाहिजेत, असे स्पष्ट मत त्यांनी मांडले.

## तृतीयपंथीयांचा रेल्वेत गोंधळ

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३१ :

रेल्वेत प्रवाशांना वेठीस धरून जबरीने त्यांच्याकडून पैसे वसूल करणाड्या आणि रेल्वेत गोंधळ घालणाड्या चार तृतीयपंथींना राजनांदगावच्या रेल्वे सुरक्षा बलाने अटक केली. मधु, सोनाली, काजल आणि ढिल्लू (सर्व रा. साईनगर, उलार्कुर्ला, जि. दुर्ग) अशी या तृतीयपंथीयांची नावे आहेत.

रोमेशकुमार हे आपल्या कुटुंबियांसह बिलासपूर सुपरफास्टने गोंदिया ते रायपूर असा प्रवास करीत होते. इंजीनला लागूनच त्यांचा डबा होता. दरम्यान, एका स्थानकाहून हे तृतीयपंथी रेल्वेत चढले. रोमेशकुमारच्या डब्यात येऊन जबरीने त्यांनी प्रवाशांकडून पैसे वसूल करायला सुरुवात केली. रोमेशकुमार यांनी पैसे देण्यास नकार दिला असता त्यांच्या कुटुंबियांसमोर ते अश्लिल हावभाव करू लागले. त्यामुळे रोमेशकुमार संतप्त झाले. त्यांनी रेल्वेकडे तक्रार केली.

राजनांदगावच्या प्रभारी निरीक्षक तरुणा शाहू यांना ही माहिती समजताच त्यांनी रोमेशकुमार यांच्याशी संपर्क केला. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता राजनांदगाव रेसुबचे पथक एक क्रमांकाच्या फलाटावर दाखल झाले. उपनिरीक्षक प्रसाद व त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रत्येक डब्यांची तपासणी करून शेवटी चारही तृतीयपंथीयांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे तिकीट नसल्याने त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात आली. त्याचप्रमाणे प्रवाशांना त्रास देऊन त्यांच्याकडून जबरीने पैसे वसूल केल्याप्रकरणी गुन्हा नोंदवून त्यांना अटक केली.

## यवतमाळची हिरा करणार

### आंतरराष्ट्रीय युवा संमेलनात भारताचे प्रतिनिधित्व

■ महासागर प्रतिनिधी, यवतमाळ, दि. ३१ :

येथील पब्लिक स्कूलची विद्यार्थिनी हिरा राखी देशमुख हिची व्हिएतनाम येथे होणाऱ्या सातव्या आंतरराष्ट्रीय युवा शिखर संमेलनासाठी निवड झाली आहे. या जागतिक मंचावर ती भारताचे प्रतिनिधित्व करणार असून, उद्या शनिवारी ३१ जानेवारी रोजी ती व्हिएतनाममधील 'हो ची मिन्ह' शहराकडे रवाना झाली आहे.



या संमेलनासाठी देशभरातून अनेक तरुणांचे अर्ज आले होते. अत्यंत कठीण मुलाखत प्रक्रिया, नेतृत्व क्षमता आणि युवकांना प्रेरित करण्याची कौशल्ये या निकषांवर हिराची निवड करण्यात आली आहे.

विशेष म्हणजे, या संमेलनाचा संपूर्ण खर्च आयोजकांकडून केला जाणार आहे. हिरा देशमुख सध्या वायपीएस शाळेत अकरावी विज्ञान शाखेत शिकत आहे. ती बहुआयामी व्यक्तिमत्त्वाची धनी असून, अवघ्या १६ वर्षांच्या हिराच्या नावावर अनेक पुरस्कार आहेत. तिला रनिंगमध्ये सात, निबंध स्पर्धेत दोन सुवर्ण पदक मिळाले आहेत.

कविता, वादविवाद स्पर्धा, उत्कृष्ट संचालनासाठीही अनेक पुरस्कार तिला मिळाले आहेत. नागपूर येथील एमयूएनबीमध्ये तिला 'बेस्ट व्हर्बल मेंशन' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. तिने अनेक व्यवसायिक कार्यक्रमांचे सूत्रसंचालन केले आहे.

हिरा धनुर्विद्येत पारंगत असून तिला लहानपणापासूनच वाचनाची आवड आहे. या आवडीमुळे ती विद्यार्थ्यांमध्ये समन्वयक म्हणूनही काम करते. झरी-जामणी येथील राजीव गांधी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. राखी देशमुख यांची ती कन्या आहे.

त्यांच्या राजराजेश्वरी बहुउद्देशीय संस्थेच्या माध्यमातून सामाजिक कार्यातही हिराचा सहभाग असतो. हिराच्या या यशामुळे यवतमाळच्या शैक्षणिक वैभवात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

ग्रामीण भागातील मुली जागतिक स्तरावर नेतृत्व करू शकतात, हे हिराने आपल्या कर्तृत्वातून सिद्ध केले. हिराच्या या यशाबद्दल तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## देवदर्शनासाठी गेलेला तरुण कपिलेश्वर डोहात बुडाला

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३१ :

शनिवारी सुटीमुळे कळमना परिसरातील ३५ जण देवदर्शनासाठी केळवद परिसरातील कपिलेश्वराच्या दर्शनासाठी गेले होते. मात्र तरुणाच्या अती उत्साही स्वभावामुळे संपूर्ण कुटुंबावर पश्चाताप करण्याची वेळ शनिवारी ओढवली.

दर्शनासाठी अंघोळीसाठी पाण्यात उतरलेल्या तरुणाचा खोलीचा अंदाज न आल्याने बुडून मृत्यू झाला. केळवद ग्रामीण पोलीस हद्दीतील कपिलेश्वर संगमावर शनिवारी दुपारी दिडच्या सुमारास ही घटना घडली.

यश भोलाशंकर राठोड (१९) रा. कळमना असे कपिलेश्वर मंदिर संगमावर बुडालेल्या तरुणाचे नाव आहे. कळमना परिसरातील ३५ जणांनी शनिवारी पिकनिकसाठी योजना केली. त्यानुसार सकाळी यश हा आपली आई शिवा आणि बहिण स्वातीसह कपिलेश्वरच्या दर्शनासाठी गेले. दर्शन घेतल्यानंतर यश याला पाण्यात उतरण्याचा मोह झाला. कपडे काढून त्याने पाण्यात उडी घेतली.

मात्र खोलीचा अंदाज न आल्याने यश लगेच गटांगळ्या खाऊ लागला. हे पाहून परिसरातील नागरिकांनी आरडाओरड सुरू केली. लगेच काही जणांनी हितज्योती आधार फाउंडेशनचे हितेश बनसोड यांना माहिती दिली. त्यांनी केळवद पोलीस ठाण्याला सुचना केली. त्याच वेळी गस्तीवर निघालेले केळवदचे ठाणेदार आशिष सिंह ठाकूर, मेजर सुधीर यादगिरे यांनी घटनास्थळी धाव घेतली.

**ठाणेदारांनी स्वत: मारली उडी**

अवघ्या काही मिनिटांत घटनास्थळी पोचलेले ठाणेदार ठाकूर यांनी घटनेचे गांभिर्य ओळखून जीवावर उदार होत पाण्यात उडी घेतली. चांगले पोहता येत असल्याने ठाणेदार ठाकूर यांनी खोल बुडालेल्या यश राठोडला बाहेर काढले.

मात्र, नाकातोंडात पाणी गेल्याने मुलाला तत्काळ सावनेर येथील शासकीय रुग्णालयात हलवण्यात आले. डॉक्टरांनी तपासणी करून मुलाला मृत घोषित केले. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. पिकनिकसाठी गेलेल्या कुटुंबावर मुलाच्या अतिउत्साहामुळे दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

## अजितदादांच्या 'घड्याळा'ची सूत्रं आता वहिनींच्या हाती

■ दीपक कैतके मुंबई, दि. ३१ :

राज्याच्या राजकारणातील सर्वात मोठा सस्पेन्स अखेर संपला आहे. अजित दादांच्या एक्झिटनंतर पोरक्या झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेसला नवा 'कॅप्टन' मिळाला आहे.

अजितदादांची रिक्त जागा भरण्यासाठी पक्षाने सुनेत्रा पवार यांची विधिमंडळ गटनेतेपदी निवड केली आहे. ज्येष्ठ नेत्यांनी घेतलेल्या या निर्णयामुळे आता सरकारमधील राष्ट्रवादीचा चेहरा अधिकृतपणे बदलला असून, सत्तेची नवी समीकरणं आता वहिनींच्या भोवती फिरणार असल्याचं स्पष्ट झालं आहे.

गेल्या दोन दिवसांपासून पक्षात नेतृत्वावरून अनेक नावं चर्चेत होती. मात्र, आज झालेल्या बैठकीत ज्येष्ठ नेते दिलीप वळसे-पाटील यांनी सुनेत्रा वहिनींच्या नावाचा प्रस्ताव मांडला आणि त्याला छगन भुजबळ यांनी तातडीने दुजोरा दिला.

ही निवड बिनविरोध करून राष्ट्रवादीच्या नेत्यांनी एक महत्त्वाचा संदेश दिला आहे.... पक्ष अजूनही पवार कुटुंबाच्याच नेतृत्वाखाली एकजूट आहे.

**'वर्षा' वरील खलबतं यशस्वी**



**निवडीमागचं खरं गुपित काय?**

सुनेत्रा पवार यांची निवड ही केवळ भावनिक नसून त्यामागे मोठी राजकीय रणनीती दडलेली आहे.

**आमदारांची मोट:** अजितदादांच्या गटातील आमदारांना फुटण्यापासून रोखण्यासाठी 'पवार' हे नाव असणं अनिवार्य होतं.

**दिल्लीचा कौल:** राज्यसभा खासदार म्हणून सुनेत्रा वहिनींचा दिल्लीतील वावर आणि भाजपच्या वरिष्ठ नेत्यांशी असलेले संबंध पक्षासाठी फायद्याचे ठरणार आहेत.

**विलीनीकरणाला 'चेकमेट':** शरद पवारांनी विलीनीकरणाच्या चर्चा सुरू करून जो पेच निर्माण केला होता, त्याला ही निवड म्हणजे एक चोख उत्तर मानलं जात आहे.

सुनेत्रा पवार यांचा खरा कस लागणार आहे तो विधिमंडळाच्या आगामी अधिवेशनात.

अजितदादांच्या त्या तडफदार भाषणांची आणि कार्यपद्धतीची जागा सुनेत्रा वहिनी कशा प्रकारे घेतात, याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे डोळे लागले आहेत.

## ट्रॅक्टर ट्रॉलीवर दुचाकी धडकली : दोघांचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. ३१ :

शिरजगाव कसबा पोलिस ठाण्याच्या हद्दीतून जाणाऱ्या खरपी ते बहिरम मार्गावरील निंभोरा फाट्याजवळ एक ट्रॅक्टर ट्रॉली नादुरुस्त झाल्यामुळे रस्त्यावर उभी होती. त्यावेळी मागून आलेली एक दुचाकी या ट्रॉलीवर जाऊन धडकली.

या अपघातात दुचाकीवरील दोघांचा घटनास्थळीच मृत्यू झाला आहे. हा अपघात शुक्रवारी (दि. ३०) रात्री आठ वाजताच्या सुमारास झाला आहे. दोन्ही मृतक मध्यप्रदेशातील बैतुल जिल्ह्यातील रहीवासी आहेत. विजय झर्री कास्देकर (२२) आणि शिवलाल हिरालाल धाडसे (५५, दोघेही रा. लोपईठाना ता. आठनेर जि. बैतूल) अशी अपघातातील मृतकांची नावे आहेत.

रात्री साडेसात ते आठ वाजताच्या सुमारास विजय व शिवलाल हे दुचाकीने जात होते. त्यावेळी मार्गातील निंभोरा फाट्याजवळ मका घेऊन जाणारी एक ट्रॅक्टर ट्रॉली नादुरुस्त स्थितीत उभी होती. ही ट्रॉली दुचाकी चालकाला दिसली नाही, त्यामुळे भरधाव दुचाकी ट्रॉलीवर मागून जोरदार जाऊन धडकली.

या अपघातात दुचाकीवरील दोघेही जागीच मरण पावले आहे. दोघांनाही अचलपूर येथील उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आले असुन त्यांच्या नातेवाईकांना माहीती देण्यात आली आहे. अपघाताची माहीती मिळताच शिरजगावचे ठाणेदार महेंद्र गवई पथकासह घटनास्थळी पोहचले. गावकरी व पोलीस पथकाच्या मदतीने मृतदेह रूग्णालयात नेण्यात आले.

## टेम्पोच्या धडकेने चिमुकली ठार

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३१ :

घरासमोर खेळत असलेल्या चिमुकलीला टेम्पोचालकाने धडक देऊन जागीच चिरडल्याची घटना वाठोडा हद्दीत साईबाबानगर, खरबी येथे घडली.

दुपारी एकच्या सुमारास ही घटना घडली. घटनेच्या वेळी प्रियांशी विष्णू देवपाच ही १८ महिन्याची चिमुकली घरासमोर खेळत होती. त्याचवेळी टेम्पोचालकाने प्रियांशीला धडक देऊन जागीच चिरडले.

याप्रकरणी वाठोडा पोलिसांनी अपघाताचा गुन्हा नोंदवून टेम्पोचालक विष्णू सावनलाल गौतम (५१) धनगवळीनगर यास अटक केली. या घटनेने परिसरात शोककळा पसरली आहे.

# 'त्या' शिक्षकांची सेवा संपुष्टात येणार?

■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. ३१ :

नागपूर जिल्ह्यात शालार्थ आयडी घोटाळा समोर आला होता. या प्रकरणाची चौकशी पोलिसांसोबत राज्याच्या विशेष तपास समिती मार्फत चौकशी सुरू आहे.

पोलिसांनी गुन्हे दाखल करून आतापर्यंत ३० वर आरोपींना अटक केली आहे. यात शिक्षण आजी- माजी शिक्षण उपसंचालक, प्राथमिक शिक्षणाधिकाऱ्यांचाही समावेश आहे. या कारवाईमुळे शिक्षण विभागात चांगलीच खळबळ उडाली आहे. या घोटाळ्यानंतर शिक्षण विभागाने पगार मंजूर करण्यासंदर्भात अनेक नव्या अटी घातल्या. हा घोटाळा समोर आल्यानंतर संबंधित शिक्षकांचे पगार ही रोखण्यात आले.

गेल्या दहा महिन्यापासून त्यांचे पगार झाले नाही. दरम्यान शिक्षण प्रधान सचिवांनी या घोटाळ्याशी संबंधित शिक्षकांची एकस्तर वरिष्ठ अधिकाऱ्यामार्फच चौकशी करण्याचे आदेश दिले. त्यानंतर शिक्षण उपसंचालक माधुरी सावरकर यांनी संबंधित सर्व शिक्षक, मुख्याध्यापक, शाळा संचालकांना नोटीस पाठवून सुनावणीसाठी हजर राहण्यास सांगितले. त्यांच्याकडून सुनावणी घेण्यात आली.

ज्यांना कागदपत्र सादर केले नाही, त्यांच्याबाबत मोठा निर्णय घेण्यात येणार असल्याची चर्चा आहे. बोगस शालार्थ आयडी प्रकरणातील संशयित शिक्षकांची सुनावणी उपसंचालक घेत असून कागदपत्र सादर न केलेल्या शिक्षकांची सेवाच समाप्त करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली.

**शालार्थ आयडी घोटाळा**

नागपूर जिल्ह्यात बोगस शालार्थ आडीच्या माध्यमातून शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची खासगी अनुदानित शाळेत नियुक्ती करून पगार सुरू करण्यात आल्याच प्रकार समोर आला. या प्रकरणी आदेश नसताना ऑनलाईन शालार्थ प्रणालीचा गैरवापर करून ६३२ शिक्षकांची शालार्थ आयडी तयार करण्यात तक्रार उपसंचालक कार्यालयाकडून सायबर पोलिसांकडे करण्यात आली. त्यापूर्वी एक तक्रार सदर पोलीस ठाण्यात करण्यात आली होती.

या प्रकरणात आतापर्यंत ३० आरोपींना अटक करण्यात आली. या शिक्षण उपसंचालक, प्राथमिक शिक्षणाधिकारी, वेतन पथक अधीक्षक, कर्मचारी, शिक्षक, मुख्याध्यापक व शाळा संचालकांचा समावेश आहे.

या प्रकरणी शिक्षण विभागाच्या प्रधान सचिवांनी संचालकांच्या अध्यक्षतेत चौकशी समिती नेमली. समितीने कागदपत्र नसलेल्या ६३२ शिक्षकांची एकस्तर वरिष्ठ अधिकाऱ्यामार्फत सुनावणी घेण्याचा अहवाल दिला. त्या आधारे शिक्षण उपसंचालक माधुरी सावरकर यांनी संबंधित सर्व शिक्षक, मुख्याध्यापक, शाळा संचालकांना सुनावणी संदर्भात नोटीस पाठविल्या. सुनावणीही घेण्यात आली. ज्या शिक्षकांचे कागदपत्र सादर झाले नाही, अशांची सेवा समाप्त करण्याची शिफारस करण्यात येणार असल्याचे समजते.

दरम्यान, सातत्याने होणारी चौकशी आणि कारवाईच्या भितीने संबंधित शिक्षक व त्यांचे कुटुंबीय धास्तावले आहेत.